
गुरुवार, ५ जानेवारी २०२३
राम प्रहर
◆ वर्ष १५ ◆ अंक १६८
www.ramprahar.com
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## निर्णायक मताचा सरपंचाला अधिकार कायम



**औरंगाबाद** : उपसरपंच निवडीसाठी सरपंचाला दोन वेळा मतदान करण्याच्या अधिकाराविरुद्धच्या याचिका औरंगाबाद खंडपीठाने फेटाळल्या आहेत. उपसरपंचाच्या निवडणुकीत पहिल्या फेरीत तसेच समसमान मते मिळाल्यास निर्णायक मत म्हणून आणखी एक मत देण्याचा सरपंचाला अधिकार देण्याबाबत ग्रामविकास मंत्रालयाने २० सप्टेंबर २०२२ रोजी एक परिपत्रक काढले होते. या परिपत्रकाला आव्हान देणाऱ्या याचिका मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात दाखल करण्यात आल्या होत्या. यावर सुनावणी करताना या सर्व याचिका न्यायालयाने फेटाळून लावल्या. औरंगाबाद खंडपीठाचे न्या. मंगेश पाटील व न्या. संतोष चपळगावकर यांच्या न्यायालयासमोर सुनावणी झाली, ज्यात त्यांनी या सर्व याचिका फेटाळण्यात आल्या.

### अंतरंग

माणगावात कॉम्प्लेक्समध्ये आढळले रक्ताचे ठिपके/२
ऑडी गाडीमधील हत्येचा उलगडा; आरोपी अटकेत/३
टीम इंडियाची नव्या वर्षात विजयी सुरुवात/८

# राज्यावरील वीज संकट टळले

## कर्मचाऱ्यांचा संप उपमुख्यमंत्र्यांच्या यशस्वी मध्यस्थीनंतर मागे

**मुंबई : प्रतिनिधी**

महावितरणच्या वीज कर्मचाऱ्यांनी मध्यरात्रीपासून पुकारलेला संप मागे बुधवारी (दि. ४) दुपारी मागे घेण्यात आला. उपमुख्यमंत्री व ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस आणि वीज कर्मचारी संघटनांच्या प्रतिनिधींमध्ये झालेल्या बैठकीत सकारात्मक तोडगा काढण्यात आला. त्यामुळे राज्यातील जनतेलाही दिलासा मिळाला आहे.

महावितरणचे खासगीकरण होऊ नये या व इतर मागण्यांसाठी महावितरण कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी तीन दिवसांचा संप पुकारला होता. राज्यातील जनतेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या प्रश्नावर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मध्यस्थी केली.



उपमुख्यमंत्री फडणवीस, ऊर्जा विभागाचे अधिकारी, महावितरण, महानिर्मिती, महापारेषण विभागाचे अधिकारी आणि विविध वीज कर्मचारी संघटनांच्या पदाधिकाऱ्यांमध्ये दुपारी सह्याद्री अतिथीगृहात बैठक झाली. या बैठकीनंतर उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी पत्रकारांना माहिती देताना सांगितले की, राज्य सरकारला वीज कंपन्यांचे खासगीकरण करायचे नाही. उलट येत्या तीन वर्षांत राज्य सरकार ५० हजार कोटींची गुंतवणूक करणार आहे. अदानी समुहाने समांतर परवान्यासाठी अर्ज केला. या संदर्भात बोलताना फडणवीस यांनी सांगितले की, समांतर परवान्याबाबत महावितरण, सरकारने अर्ज वीज नियामक आयोगाकडे करायला हवा, अशी भूमिका वीज कर्मचारी संघटनांनी मांडली होती. राज्य वीज नियामक आयोगाकडे आपल्या हिताचे निर्णय घेतला जाईल, अशी भूमिका सरकार घेईल. कंत्राटी कामगारांसंदर्भात त्यांना अॅडीशनल मार्क देऊन येणाऱ्या भरती प्रक्रियेत स्पेशल केस म्हणून राज्य सरकार वयात सवलत देऊन त्यांचा समावेश सेवेत कसा करून घेता येईल याला प्राधान्य देणार आहोत, असे आश्वासनही त्यांनी दिले. यानंतर संप मागे घेण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले.



## कवाडे-शिंदे यांची युती

**मुंबई : प्रतिनिधी**

एकीकडे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे आणि डॉ. प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीच्या युतीची चर्चा सुरू असतानाच दुसरीकडे पीपल्स रिपब्लिकन पक्ष आणि बाळासाहेबांची शिवसेना पक्षांची युती झाली आहे. मुंबईत बुधवारी (दि. ४) मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन प्रा. जोगेंद्र कवाडे यांनी युतीची घोषणा केली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या धडाकेबाज कार्यपद्धतीने प्रभावित होऊनच आम्ही युतीचा निर्णय घेतला आहे. गोरगरीबांच्या, वंचितांच्या हक्कासाठी ही युती काम करेल, असे प्रा. कवाडे म्हणाले.

### अनिल परब यांना दणका

## १० कोटींची मालमत्ता ईडीने केली जप्त

**मुंबई : प्रतिनिधी**

उद्धव ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांना सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) दणका दिला आहे. ईडीकडून परब यांच्याशी निगडीत १० कोटींची मालमत्ता जप्त करण्यात आली आहे. रत्नागिरीतील साई रिसॉर्ट प्रकरणी ईडीने मनी लॉण्डरिंगचा गुन्हा दाखल केला होता. या प्रकरणी ईडीकडून चौकशीदेखील झाली होती. त्यानंतर बुधवारी (दि. ४) ईडीकडून जप्तीची कारवाई करण्यात आली.

ईडीने या कारवाईसंदर्भात एक ट्वीटदेखील केले आहे. यात अनिल परब, साई रिसॉर्ट एनएक्स आणि इतर ठिकाणची १०.२० कोटी रुपयांची मालमत्ता मनी लॉण्डरिंगप्रकरणी जप्त



करण्यात आली आहे, अशी माहिती देण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार जप्त करण्यात आलेल्या मालमत्तेत रत्नागिरीतील ४२ गुंठे जमीन आणि तेथे बांधण्यात आलेल्या साई रिसॉर्टचा समावेश आहे. पर्यावरण, वन आणि हवामान बदल मंत्रालयाच्या तक्रारीच्या आधारे ईडीने ही कारवाई केली आहे.



# भाजप सहसंघटनमंत्री शिवप्रकाश यांचे रायगडातील पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन

■ महाड दौऱ्यात महापुरुषांना अभिवादन



**महाड : प्रतिनिधी**

भाजपचे राष्ट्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश यांनी बुधवारी (दि. ४) महाडचा दौरा करीत पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. या वेळी त्यांचे पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व सहकाऱ्यांनी जोरदार स्वागत केले.

उत्तर व दक्षिण जिल्हा पदाधिकारी कोअर बैठकीसाठी शिवप्रकाश हे महाड येथे आले होते. या वेळी झालेल्या बैठकीत त्यांनी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी प्रथम चवदार तळे येथे जाऊन महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले तसेच नंतर किल्ले रायगड येथे जाऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीसमोर नतमस्तक होऊन अभिवादन केले.

या दौऱ्यात प्रदेश कार्यालयीन महामंत्री रवींद्र अनासपुरे, संघटन मंत्री शैलेंद्र दळवी, प्रदेश सदस्य बाळासाहेब पाटील, जिल्हा संघटन सरचिटणीस अविनाश कोळी, मिलिंद पाटील, बिपीन महामुणकर, दीपक बेहेरे, उपाध्यक्ष राजेश मपारा, महिला मोर्चा जिल्हाध्यक्ष अश्विनी पाटील, हेमा मानकर, युवा जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अमित घाग, पनवेलच्या माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, भाजप रोहा तालुका सोपान जांबेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## निवडक

### देवेन भारती मुंबईच्या विशेष पोलीस आयुक्तपदी

**मुंबई** : महाराष्ट्राच्या गृह विभागाने बुधवारी (दि. ४) १९९४च्या बॅचचे आयपीएस अधिकारी देवेन भारती यांची मुंबईचे विशेष पोलिस आयुक्त म्हणून नियुक्ती केली. राज्य सरकारने प्रथमच मुंबई विशेष पोलीस आयुक्तपदाची निर्मिती केली आहे. वरिष्ठ आयपीएस अधिकारी देवेन भारती यांना यापूर्वी पोलीस खात्यातील विविध पदांवर काम पाहिले आहे. यापूर्वी ते महाराष्ट्र एटीएसचे प्रमुखही होते.

### काँग्रेस नेत्या सोनिया गांधी रुग्णालयात दाखल

**नवी दिल्ली** : काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांना बुधवारी (दि. ४) दिल्लीतील गंगाराम रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यासोबत मुलगी प्रियांका गांधी-वढ्रादेखील उपस्थित होत्या. त्यांनी आईला श्वास घेण्यास त्रास होत असल्याचे म्हटले आहे, तर पीटीआयच्या सूत्रांनी सोनिया गांधींना नियमित तपासणीसाठी दाखल केल्याचे म्हटले.

## धनंजय मुंडेंच्या गाडीला अपघात; मुंबईला हलविले



**परळी : प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार व माजी मंत्री धनंजय मुंडे यांच्या गाडीला बुधवारी मध्यरात्री (दि. ४) परळीमध्ये अपघात झाला. यात त्यांना मार लागला असून त्यांची प्रकृती स्थिर आहे.

चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने अपघात झाल्याची माहिती धनंजय मुंडे यांनी ट्विटर आणि फेसबुकद्वारे दिली. अपघातानंतर मुंडे यांना तत्काळ खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी त्यांच्यावर उपचार सुरू केले, मात्र त्यांच्या छातीला मार लागला असल्याने पुढील उपचारांसाठी त्यांना मुंबईतील ब्रीच कँडी रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

## ऋषभ पंतही उपचारासाठी मुंबईत दाखल



**मुंबई** : कार अपघातानंतर डेहराडूनमधील रुग्णालयात दाखल असलेला भारतीय टीमचा धडाकेबाज खेळाडू ऋषभ पंतला पुढील उपचारासाठी मुंबईला हलविण्यात आले आहे. तो बुधवारी (दि. ४) एअर अॅम्बुलन्सने मुंबईत दाखल झाला. मुंबईत पंतवर लिगामेंट सर्जरी होणार असल्याचे समजते.

उत्तराखंडमध्ये झालेल्या भीषण कार अपघातात पंत थोड्यात बचावला. हा अपघात एवढा भीषण होता की यामध्ये कार जळून खाक झाली. जखमी पंतवर डेहराडूनमधील मॅक्स हॉस्पिटलमध्ये उपचार सुरु होते. आता त्याच्यावर मुंबईतील कोकिलाबेन अंबानी रुग्णालयात उपचार होणार असल्याची माहिती आहे.

# 'रयत'ने नाविन्यपूर्ण व अद्ययावत शिक्षण द्यावे -खासदार शरद पवार

■ विशेष अभीष्टचिंतन व कृतज्ञता सोहळा उत्साहात; मान्यवरांची उपस्थिती





**सातारा : प्रतिनिधी**

कर्मवीर अण्णांनी रयत शिक्षण संस्थेच्या माध्यमातून सगळ्यांसाठी शिक्षणाचे दालन उभे केले. आपली ही संस्था देशातील महत्त्वाची संस्था असून ती नव्या वळणावर आहे. या पुढच्या काळात संस्थेने भविष्याचा वेध घेऊन नाविन्यपूर्ण व अद्ययावत शिक्षण द्यावे, असे प्रतिपादन संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी बुधवारी (दि. ४) येथे केले.

रयत शिक्षण संस्थेत खासदार शरद पवार यांचा सुवर्णमहोत्सवी सक्रिय कार्यकाळ पूर्ण झाल्याबद्दल त्यांच्या ८२व्या वाढदिवसाचे औचित्य साधून संस्थेने विशेष अभीष्टचिंतन व कृतज्ञता सोहळा समारंभ आयोजित केला होता. त्या वेळी ते बोलत होते. खासदार श्रीनिवास पाटील यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या समारंभास प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, तर संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार दिलीप वळसे-पाटील, सिम्बॉयसिसचे शं. बा. मुजुमदार यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले.

या समारंभात ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या हस्ते खासदार शरद पवार यांना मानपत्र व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. (पान २ वर..)

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून संस्थेला पाच कोटींची देणगी

**या वेळी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, थोर देणगीदार, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संस्थेला पाच कोटी रुपयांची देणगी दिली. या रकमेचा धनादेश त्यांनी संस्थेचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांच्याकडे सुपूर्द केला.**

## आजपासून नावडे फेज २मध्ये आमदार चषक क्रिकेट स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नावडे येथील जय हनुमान क्रिकेट क्लबच्या वतीने ५ ते ८ जानेवारीदरम्यान आमदार चषक टेनिस क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या नावडे फेज २ येथील सिडको मैदानावर होणाऱ्या या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते, तर बक्षीस वितरण पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते होणार आहे.



या वेळी भाजपचे पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष जयंत पगडे यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेतील लोकप्रतिनिधी आणि पदाधिकाऱ्यांची उपस्थिती असणार आहे. या स्पर्धेतील विजेत्या संघास एक लाख रुपये व आकर्षक चषक, उपविजेत्यास ५० हजार रुपये व चषक तसेच तृतीय आणि चतुर्थ क्रमांकास प्रत्येकी २५ हजार रुपये व आकर्षक चषक आणि मालिकावीर, उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षक यांना बक्षिसे देऊन मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेचा क्रिकेटप्रेमींनी लाभ घ्यावा, असे आवाहन स्पर्धेचे आयोजक प्रशांत खानावकर व सहकाऱ्यांनी केले आहे.

# विश्व मराठी संमेलनाचे शानदार उद्घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासनातर्फे मुंबईत आयोजित तीन दिवसीय पहिल्या विश्व मराठी संमेलनाचे उद्घाटन बुधवारी (दि. ४) मराठमोळ्या पद्धतीने झाले. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दीप प्रज्ज्वलन करून संमेलनाच्या उद्घाटन सत्राचा आरंभ केला. 'मराठी तितुका मेळवावा' हे विश्व मराठी संमेलनाचे घोषवाक्य आहे.

मराठी भाषेची गोडी वाढावी तसेच सर्वांगीण प्रचार व प्रसार होण्यासाठी राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे आणि सांस्कृतिक कार्य व उद्योग विभागाच्या सहकार्याने वरळीच्या नॅशनल स्पोर्ट्स क्लब ऑफ इंडिया येथे विश्व मराठी संमेलन होत आहे. उद्घाटन समारंभास विधानसभा अध्यक्ष अॅड. राहुल नार्वेकर, मराठी भाषामंत्री दीपक केसरकर, उद्योगमंत्री उदय सामंत, खासदार राहुल शेवाळे, हेमंत पाटील, आमदार आशिष शेलार, यामिनी जाधव, प्रकाश सुर्वे यांच्यासह वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते. या संमेलनाच्या निमित्ताने काढलेल्या लोकराज्य विशेषांकाचे प्रकाशन या वेळी करण्यात आले.



या वेळी आपल्या भाषणात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, मुंबईसह महाराष्ट्र मिळवताना १०६ जणांनी बलिदान दिले याची जाणीव आपल्या सगळ्यांना आहे. त्यामुळे मुंबईत मराठी भाषेची, मराठी भाषिकांची पिछेहाट होणार नाही. मुंबईत मराठी ठसा आणि मराठी टक्का कायम राहावा यासाठी आमच्या सरकारचे प्रयत्न सुरु आहेत. मराठी माणूस मुंबईतून बाहेर जाता कामा नये, पण जो मराठी माणूस मुंबईतून बाहेर गेला त्याला पुन्हा मुंबईत परत आणण्यासाठी पुनर्विकासाचे प्रकल्प जे थांबलेले आहेत त्याकरिता नियम कायदे बदलण्यास आमचे सरकार तयार आहे. ते पुढे म्हणाले की, कर्नाटक सीमाभागातील महाराष्ट्राच्या गावांसाठी मी आणि उपमुख्यमंत्री दोघेही दिल्लीला गेलो होतो. या वेळी केंद्रीय गृहमंत्र्यांनी पहिल्यांदा या विषयावर हस्तक्षेप केला, ही आपल्यासाठी जमेची बाजू आहे.

या वेळी बोलताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मराठी केवळ एक भाषा नाही. ही एक अभिव्यक्ती असून ती विश्वाला कल्याणाचा विचार देते. त्यांनी पुढे मराठीला ज्ञानभाषा करण्याचे काम आम्ही करणार आहोत, असेही सांगितले.

## उर्फी जावेदला महिला आयोगाचे समर्थन आहे का?

### भाजप नेत्या चित्रा वाघ यांचा सवाल

**मुंबई : प्रतिनिधी**

अभिनेत्री उर्फी जावेद प्रकरणात भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्रा वाघ पुन्हा आक्रमक झाल्या आहेत. या संदर्भात त्यांनी महिला आयोगालाही जाब विचारला आहे. उर्फीच्या उघडंनागडं फिरण्याला महिला आयोगाचे समर्थन आहे का, असा सवाल त्यांनी केला.

महिला आयोगाची फक्त भाषा नको आहे तर कृती हवी आहे. भर रस्त्यात, सार्वजनिक ठिकाणी उघडंनागडं फिरणं ही महाराष्ट्राची संस्कृती आहे का? उर्फी जावेद अत्यंत बीभत्सपणे रस्त्यावर फिरते आहे. महिला आयोगाने याचा जाब का विचारला नाही? माझा विरोध उर्फी या व्यक्तीला नाही, तर तिच्या उघड्यानागड्या, घाणेरड्या, ओंगळवाण्या आणि



किळसवाण्या विकृतीला आहे. ज्या पद्धतीने महिला आयोगाने भूमिका मांडली त्याचा अर्थ असे उघडंनागडं फिरण्याला महिला आयोगाचं समर्थन आहे का? कायदा कायद्याचे काम करणारच आहे, मात्र महिला आयोगाला याबाबत काही वाटते आहे की नाही? अशा पद्धतीचा नंगानाच हा महाराष्ट्रात आम्ही खपवून घेणार नाही. छत्रपती शिवाजी महाराजांचा हा महाराष्ट्र आहे. उघडंनागडं सार्वजनिक ठिकाणी फिरणे ही आमची संस्कृती नाही, असे चित्रा वाघ यांनी म्हटले आहे.

# माणगावमध्ये इमारतीत आढळले रक्ताचे ठिपके

## महालक्ष्मी निवारामधील प्रकार : नागरिक भयभीत, घातपाताची शक्यता, तपास सुरू

**माणगांव : प्रतिनीधी**

माणगाव शहरातील उत्तेखोलवाडीत नव्याने निर्माण झालेल्या महालक्ष्मी निवारा कॉम्प्लेक्समध्ये ३ जानेवारी २०२३ रोजी रात्रीच्या सुमारास काहीतरी भयानक प्रकार घडला. या प्रकारामुळे महालक्ष्मी निवासामधील नागरीक भयभीत झाले आहेत. या इमारतीमध्ये जिने आणि टेरेसवर रक्ताचे शिंतोडे पडल्याचे आढळले.



या कॉम्प्लेक्सच्या इमारत क्रमांक ३ च्या – विंग आणि इ विंगचे जिने आणि टेरेसवर रक्ताचे शिंतोडे आणि ठिपके ४ जानेवारी रोजी राहणाऱ्या नागरिकांना दिसल्याने उत्तेखोलवाडी व महालक्ष्मी निवारा परिसरात एकच खळबळ माजली असून निवारा कॉम्प्लेक्समध्य महालक्ष्मी निवाराच्या सध्या ३ इमारतीमध्ये नागरिक आहेत. मात्र या रहिवासी लोकांची कोणत्याही प्रकारची गृहनिर्माण संस्था (सोसायटी) अद्यापपर्यंत रजिस्टर झालेली नाही. या बिल्डरकडून कॉम्प्लेक्स परिसरात लावलेले सीसीटीव्ही कॅमेरे निकामी झाले आहेत. कॅमेरे दुरुस्ती करून घ्यावे अशी मागणी रहिवासी नागरीकांनी बिल्डर आणि व्यवस्थापनाकडे करून देखील दुर्लक्ष केल्याने घडलेल्या प्रकाराचे गूढ उलगडण्यास विलंब हात आहे, अशी माहिती स्थानिक रहिवाश्यांनी पत्रकारांना दिली.

तसेच या कॉम्प्लेक्सचे जबाबदार रहिवासी सलील चव्हाण पत्रकाराना म्हणाले की हा प्रकार कदाचित ३ जानेवारी रात्री ११च्या दरम्यान घडला असावा..! तर मग सुरक्षारक्षक कुठे होते? ही पण चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे इमारत क्रमांक३ च्या – विंग आणि इ विंगच्या जिने आणि टेरेसवर आढळलेल्या रक्तांच्या ठिपक्याप्रमाणे असे ठिपके उत्तेखोल वाडीची एन्ट्री व महाराष्ट्र नवनिर्माण सेना दक्षिण रायगड जिल्हा कार्यालयासमोरील रस्त्यापर्यंत दिसून आले आहे.

प्रथमदर्शनी पाहता हे रक्त मानवी असल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणाची दखल घेत माणगाव पोलीस निरीक्षक राजेंद्र पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली माणगाव पोलीसांनी घटनास्थळी धाव घेत रक्ताचे नमुने गोळा करून तपासाची सूत्रे हलविली आहेत.

# कॅम्पिंग टेंटव्दारा फसवणूक; रेवदंडा पोलिसांत गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

कॅम्पींग टेंटव्दारा दिलेल्या आश्वासित सुविधा न पुरविल्याने महिला ग्राहकांनी रेवदंडा पोलिस ठाणे येथे फसवणूकीचा गुन्हा दाखल केल्याने परिसरात चर्चेचा विषय ठरला. नाशिक येथील महिला फिर्यादी यांनी रेवदंडा येथे ३१ डिसेंबरची मौजमज्ञा करण्यासाठी रेवदंडा समुद्र किनारी असलेल्या मुनलाईट कॅम्पींग व्यावसायीकांशी संपर्क करून बुकींग घेतले. रेवदंडा येथे ३१ डिसेंबर रोजी मुनलाईट कॅम्पींग टेंट येथे आले असताना तेथे त्यांना कॅम्पींग टेंट मालकांनी आश्वासीत केल्याप्रमाणे टेंट स्टे, जेवण, स्नॅक्स,डी.जे. पार्टी, लाईटिंग लाईट, म्युझीक बँड, फोटो, स्वच्छता, नाष्टा या सुविधा उपलब्ध केल्या नाहीत.महिला ग्राहकांला कॅम्पींग टेंट मालकानी आश्वासीत सुविधा न पुरविता रूपये ३ हजाराची फसवणूक केली, अशी तक्रार रेवदंडा पोलिस ठाणे येथे मुनलाईट कॅम्पींग टेंटच्या मालक व चालक यांचे विरोधात नोंदविली. रेवदंडा पोलिस ठाणे यथे महिला फिर्यादी यांनी नोंदविलेल्या तक्रारीनुसार मुनलाईट कॅम्पींगच्या दोघाचे विरोधात भादविकलम ४२०,४०६,३४ प्रमाणे गुन्हा नोंदविला आहे.

# पनवेल शहर परिसरात आढळले अनोळखी मृतदेह

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल शहर परिसरात गेल्या दोन दिवसांमध्ये अनोळखी व्यक्तींचे मृतदेह आढळले असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

एक व्यक्ती वय ३५ ते ४० वर्ष असून डोक्याचे केस काळे, दाढी मिशी वाढलेली, अंगाने सडपातळ, चेहरा उभट आहे. तसेच अंगात पांढरा शर्ट, निळी जिन्स आहे.

दुसरा व्यक्ती हा तक्का परिसरातील पंचमुखी हनुमान मंदिराकडुन रेल्वे स्टेशनकडे जाणाऱ्या रोडवरील क्रिकेट मैदानाच्या जवळील फुटपाथवर एका अनोळखी इसमाचा मृतदेह आढळून आला आहे.

या व्यक्तीचे अंदाजे वय ३० ते ३५ वर्ष असून डोक्याचे केस मध्यम काळे, दाढी मिशी वाढलेली, अंगाने सडपातळ, चेहरा उभट आहे. तसेच अंगात पांढरी बनियान व खाकी हाफ पॅन्ट आहे.

तिसऱ्या मयत व्यक्तीचे वय अंदाजे ५० ते ५५ वर्ष असून बांधा मध्यम, रंग सावळा, उंची पाच फुट, डोक्यास टक्कल, दाढी व मिशीचे केस पांढरे वाढलेले, चेहरा उभट, नाक बसके, अंगात निळा टिशर्ट व पॅन्ट आहे.

मृतदेह आढळलेल्या चौथा व्यक्तीचे वय अंदाजे ४० ते ४५ वर्षे असून उंची ५.६ फुट, रंग सावळा, नाक सरळ तर अंगात हिरवा शर्ट व मळकट पॅन्ट आहे.

या व्यक्तींबाबत कोणाला काही माहिती असल्यास पनवेल शहर पोलीस (०२२-२७४६२३३३) किंवा सहाय्यक पोलीस निरीक्षक श्रीकांत शेंडगे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# साळाव येथून पॉवर केबलची चोरी

**रेवदंडा :** साळाव येथे जेएसडब्लू कंपनीच्या कन्वेर बेल्ट वरून चक्क १ लाख रूपये किमंतीची टेलिफोन व पॉवर केबलची चोरी अज्ञाताने केल्याची तक्रार रेवदंडा पोलिस ठाणे येथे करण्यात आली आहे. ३१ डिसेंबरच्या रात्री नववर्षाच्या स्वागताच्या मौज मस्तीत दंग असतानाच चोरटयांनी ३१ डिसेंबर रोजी रात्री आठ ते रात्री दोन वाजण्याचे दरम्यान साळाव जेएसडब्लू कंपनी जे.टी. ते सपना हॉटेल पर्यंतच्या कन्वेर बेल्टवरून चोरटयानी साळाव जेएसडब्लू कंपनीच्या कन्वेर बेल्ट वरील अंदाजे एक लाख रूपये किमंतीची टेलिफार व पॉवर केबल चोरी केली अशी तक्रार रेवदंडा पोलिस ठाणे येथे संबधीतानी केली आहे. याबाबत रेवदंडा पोलिस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास हवालदार संजय ठाकूर करत आहेत.

# सकल जैन समाजाच्या मूक मोर्चाला प्रतिसाद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जैन समाजाचे पवित्र तीर्थस्थान असलेल्या झारखंडच्या सम्मेद शिखरजी या ठिकाणाला पर्यटनस्थळ घोषित करण्याच्या निर्णयाविरुध्द मूक मोर्चा काढण्यात आला. यानिमित्त सकल जैन समाजाच्या वतीने बुधवार (दि. ४) सकाळी मेट्रो सिनेमापासून विशाल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते.



रॅलीमध्ये मुंबईच्या वेगवेगळ्या भागांमधून जैन श्रावक व श्राविका मुलांसह मोठ्या प्रमाणात सहभागी झाले होते. रॅलीचे नेतृत्व जैन साधूवर्गांनी केले असून रॅलीला अखिल भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमेटी, दिगंबर जैन, ग्लोबल महासभा, भारत जैन महामंडळ, जैन श्वेतांबर सोसायटी या संघटनेद्वारे संयुक्तरित्या आयोजन करण्यात आले होते. महारॅलीमध्ये दिगंबर जैन समाज, श्वेतांबर तेरापंथी समाज, श्वेतांबरी स्थानकवासी समाज तसेच श्वेतांबरी मुर्तीपुजक समाजातील जैन बांधव मोठ्या प्रमाणात सहभागी होते. ही रॅली मेट्रो सिनेमापासून निघून आझाद मैदानावर पोहचली व तेथे धर्मसभा आयोजित करण्यात आली होती. धर्मसभेला प. पु. १०८ आचार्य प्रणामसागरजी महाराज , नपनप्रभ महाराज यांचे मंगल उपदेश व निर्देश प्राप्त झाले आहेत. त्याचप्रमाणे प.पु. १०५ आर्यिका प्रज्ञाश्री माताजी, प.पु. १०५ आर्यिका सुज्ञानश्री माताजी व अनेक साधुसंतांचे पण मंगल सानिध्य या विशाल धर्मसभेला मिळालेत, अशी माहिती सहसंयोजक सुजित राजकुमार खोलापुरे यांनी दिली आहे.

यापूर्वी १ जानेवारी रविवार रोजी पनवेल येथील १००९ श्री. मुनिसुव्रतनाथ दिगंबर जैन मंदिरामध्ये सकाळी ९ ते १० (एक घंटाचा) ''णमोकार महामंत्र'' यांचा जापअनुष्ठान संपन्न झाले.


# कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर

**अलिबाग :** भारत निवडणूक आयोगाकडील२९ डिसेंबर २०२२ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकान्वये शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम घोषित झाला असून त्याबाबतची आचारसंहिता २९ डिसेंबर २०२२ ते ४ फेब्रुवारी २०२३ पर्यंत लागू झाली आहे.

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे- निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्दी करण्याचा दिनांक : गुरुवार, ५ जानेवारी २०२३, नामनिर्देशन सादर करण्याचा अखेरचा दिनांक : गुरुवार, १२ जानेवारी २०२३, नामनिर्देशनपत्रांची छाननी: शुक्रवार, १३ जानेवारी २०२३, उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक : सोमवार, १६ जानेवारी २०२३, मतदानाचा दिनांक व मतदानाची वेळ : सोमवार, ३० जानेवारी २०२३, सकाळी ८ ते सायंकाळी ४ वाजेपर्यंत, मतमोजणीचा दिनांक : गुरुवार, दि.२ फेब्रुवारी २०२३, निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याचा दिनांक : शनिवार, ४ फेब्रुवारी २०२३.

कोकण विभाग शिक्षक मतदार संघामध्ये ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदूर्ग हे ५ जिल्हे समाविष्ट आहेत. प्रस्तावित मतदार केंद्र, कोकण विभाग शिक्षक मतदार संघातील रायगड जिल्ह्यामध्ये एकूण ३२ मतदान केंद्र प्रस्तावित करण्यात आली आहेत.

अलिबाग तालुक्यातील यादी भाग क्रमांक २६/९१ मध्ये पुरुष संख्या १८७, स्त्री संख्या २५२ असे एकूण ४३९, आवास- यादी भाग क्रमांक २७/९१ मध्ये पुरुष संख्या ३७, स्त्री संख्या ५२ असे एकूण ८९, हाशिवरे- यादी भाग क्रमांक २८/९१ मध्ये पुरुष संख्या ४१, स्त्री संख्या २२ असे एकूण ६३, पेझारी- यादी भाग क्रमांक २९/९१ मध्ये पुरुष संख्या ९२, स्त्री संख्या ७४ असे एकूण १६६, रेवदंडा- यादी भाग क्रमांक ३०/९१ मध्ये पुरुष संख्या ३४, स्त्री संख्या ३६ असे एकूण ७०. **कर्जत तालुक्यात-** यादी भाग क्रमांक ३१/९१ मध्ये पुरुष संख्या २६४, स्त्री संख्या २७६ असे एकूण ५४०. **खालापूर तालुक्यात-** यादी भाग क्रमांक ३२/९१ मध्ये पुरुष संख्या २३४, स्त्री संख्या ४०९ असे एकूण ६४३. **महाड तालुक्यात-** यादी भाग क्रमांक ३३/९१ मध्ये पुरुष संख्या ३०१, स्त्री संख्या २१८ असे एकूण ५१९. **माणगाव तालुक्यात-** यादी भाग क्रमांक ३४/९१ मध्ये पुरुष संख्या २५०, स्त्री संख्या १७३ असे एकूण ४२३, गोरेगाव- यादी भाग क्रमांक ३५/९१ मध्ये पुरुष संख्या ९३, स्त्री संख्या ४० असे एकूण १३३. **तळा तालुक्यात-** यादी भाग क्रमांक ३६/९१ मध्ये पुरुष संख्या ७३, स्त्री संख्या १७ असे एकूण ९०. **हसळा तालुक्यात-** यादी भाग क्रमांक ३७/९१ मध्ये पुरुष संख्या ९४, स्त्री संख्या ४० असे एकूण १३४. **मुरुड तालुक्यात-** यादी भाग क्रमांक ३८/९१ मध्ये पुरुष संख्या ११९, स्त्री संख्या १०६ असे एकूण २२५. **पनवेल तालुक्यात-** यादी भाग क्रमांक ३९/९१ मध्ये पुरुष संख्या ४८१, स्त्री संख्या १२०७ असे एकूण १६८८, कळंबोली- यादी भाग क्रमांक ४०/९१ मध्ये पुरुष संख्या ४८५, स्त्री संख्या ११८० असे एकूण १६६५, पळस्पे - यादी भाग क्रमांक ४१/९१ मध्ये पुरुष संख्या ९०, स्त्री संख्या ११९ असे एकूण २०९, कर्नाळा+दापिवली- यादी भाग क्रमांक ४२/९१ मध्ये पुरुष संख्या ४५, स्त्री संख्या ४९ असे एकूण ९४, नेरे+मोरबे- यादी भाग क्रमांक ४३/९१ मध्ये पुरुष संख्या ५१, स्त्री संख्या ७६ असे एकूण १२७, **ओवळे-** यादी भाग क्रमांक ४४/९१ मध्ये पुरुष संख्या ९७, स्त्री संख्या २०१ असे एकूण २९८, ओवळे- यादी भाग क्रमांक ४४/९१ मध्ये पुरुष संख्या ९७, स्त्री संख्या २०१ असे एकूण २९८, पोयंजे- यादी भाग क्रमांक ४५/९१ मध्ये पुरुष संख्या ४, स्त्री संख्या ४ असे एकूण ८, तळोजे- यादी भाग क्रमांक ४६/९१ मध्ये पुरुष संख्या ६३, स्त्री संख्या १०६ असे एकूण १६९. **पेण तालुक्यात-** यादी भाग क्रमांक ४७/९१ मध्ये पुरुष संख्या २९२, स्त्री संख्या ३०४ असे एकूण ५९६.



**पोलादपूर तालुक्यात-** यादी भाग क्रमांक ४८/९१ मध्ये पुरुष संख्या १११, स्त्री संख्या ५४ असे एकूण १६५.

**रोहा तालुक्यात-** यादी भाग क्रमांक ४९/९१ मध्ये पुरुष संख्या १३६, स्त्री संख्या १२१ असे एकूण २५७, नागोठणे- यादी भाग क्रमांक ५०/९१ मध्ये पुरुष संख्या २०४, स्त्री संख्या १९१ असे एकूण ३९५. **सुधागड तालुक्यात-** यादी भाग क्रमांक ५१/९१ मध्ये पुरुष संख्या ११४, स्त्री संख्या ७४ असे एकूण १८८.

श्रीवर्धन तालुक्यात- यादी भाग क्रमांक ५२/९१ मध्ये पुरुष संख्या ६४, स्त्री संख्या ६६ असे एकूण १३०, बोर्ली पंचतन- यादी भाग क्रमांक ५३/९१ मध्ये पुरुष संख्या ७७, स्त्री संख्या ४५ असे एकूण १२२. **उरण तालुक्यात-** यादी भाग क्रमांक ५४/९१ मध्ये पुरुष संख्या १०६, स्त्री संख्या १८२ असे एकूण २८८, चिरनेर- यादी भाग क्रमांक ५५/९१ मध्ये पुरुष संख्या ७३, स्त्री संख्या ७९ असे एकूण १५२. अशी एकूण पुरुष संख्या ४ हजार ३१२ तर स्त्री संख्या ५ हजार ७७३ असे एकूण १० हजार ८५.

# उपायुक्त कल्पिता पिंपळे यांची मीरा-भाईंदर महापालिकेत बदली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका उपायुक्त कल्पिता पिंपळे यांची मीरा-भाईंदर महानगरपालिकेत बदली झाली असून ,आयुक्त तथा प्रशासक श्री.गणेश देशमुख यांनी आज(४ जानेवारी) महापालिकेच्या मुख्यालयातील बैठकगृहामध्ये झालेल्या कार्यक्रमामध्ये त्यांना पुष्पगुच्छ देऊन भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रशांत रसाळ, उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त गणेश शेटे, उपायुक्त कैलास गावडे, शहर अभियंता संजय कटेकर, मुख्य लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, सहाय्यक आयुक्त डॉ.वैभव विधाते यांच्यासह पालिकेतील सर्व विभागांचे विभाग प्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते. उपायुक्त कल्पिता पिंपळे यांनी आपल्या पनवेल महापालिकेच्या कारकिर्दीमध्ये वाहन विभाग, भांडार विभाग आणि पंतप्रधान आवास योजनेचे काम उत्तम सांभाळले. पंतप्रधान आवास योजने अंतर्गत पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्प मार्गी लावण्यामध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता. तसेच तिसऱ्या प्रकल्पास पर्यायी जागा मिळण्याच्या दृष्टीने हिरहिरीने प्रयत्न् केला.





**पनवेल : कराडे खुर्दचे माजी सरपंच विजय मुरकुटे यांना वाढदिवसानिमित्त जांभिवलीतील भाजप नेते रवींद्र कोंडीलकर, कार्यकर्ते मनुहार कोंडीलकर, दिलीप टकले, राजेश सोनावणे आदींनी शुभेच्छा दिल्या.**

# भाजपचे प्रवक्ते माधव भांडारी यांना पत्नीशोक



**पुणे : रामप्रहर वृत्त**

पुणे येथे भाजपचे प्रवक्ते माधव भांडारी यांच्या पत्नी सुमित्रा भांडारी यांचे अल्पशा आजाराने बुधवारी (दि. ४) निधन झाले. सकाळी माधव भांडारी यांच्या प्रभात रस्त्यावरील निवासस्थानी पार्थिव अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले होते, तर वैकुंठ स्मशानभूमी, नवी पेठ, पुणे येथे दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

## दुखवटा

### प्रभाकर आंबुलकर

**मुंबई :** रा. स्व. संघाचे ज्येष्ठ प्रचारक प्रभाकरराव आंबुलकर यांचे बुधवारी (दि. ४) सकाळी विवेकानंद



रुग्णालय खापरी येथे अल्पशा आजाराने वयाचे ८४ व्या वर्षी निधन झाले. बाल्यकाळापासून स्वयंसेवक असलेले व काही काळ पुढे तरुण वयात ओरिसा येथे प्रचारक म्हणून राहिले.पंडित बच्छराज व्यास विद्यालयात शिक्षकाची नोकरी केली. उद्या गुरुवार (दि. ५) सकाळी ८ ते १० या वेळात डॉक्टर हेडगेवार भवन महाल येथे अंत्यदर्शन घेता येईल. सकाळी १० वाजता अंतयात्रा प्रारंभ होउन गंगाबाई घाट येथे अंत्यविधी होईल.

### अनंत मेढेकर

**ठाणे :** निवृत्त न्यायाधीश अनंत मेढेकर (वय ९३) यांचे रविवारी (दि. १) ठाणे येथील निवासस्थानी निधन झाले.



त्यांच्या पश्चात एक मुलगा व दोन मुली सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मेढेकर हे काही काळ ग्राहक तक्रार निवारण मंचचे अध्यक्ष होते. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली असून त्यात ऐसी भाषणे रसिके, युवर पिझ्झा, अनंतकोटी हास्य ओटी, शतरंगी विनोद, स्पॉटलाईट ऑन सीपीसी यांचा समावेश आहे. त्यांनी राज्य चित्रपट महोत्सवाचे परीक्षक म्हणूनही काम पाहिले. नीलपुष्प साहित्य मंडळाचेही ते अध्यक्ष होते.

पान १ वरुन

## ‘रयत’ने नाविन्यपूर्ण व अद्ययावत शिक्षण द्यावे -खासदार शरद पवार

गेल्या ५० वर्षांमध्ये ‘रयत’च्या व्यासपीठावरून खासदार शरद पवार यांनी विचार व्यक्त केलेल्या भाषणांचे संकलन केलेल्या ‘रयतच्या विचारमंचावरून’ या ग्रंथाचे तसेच विविध कार्यक्रमांमधील छायाचित्रांचे संकलन करून साकारलेल्या सुवर्णबिंदू या कॉफी टेबल बुकचे व शरदोत्सव या दृकश्राव्य डॉक्युमेंटरीचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले तसेच रयतवाणी कम्युनिटी रेडिओ स्टेशनचे उद्घाटन करण्यात आले.

संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. सचिव प्राचार्य डॉ. विठ्ठल शिवणकर यांनी प्रास्ताविक, सूत्रसंचालन प्रा. डॉ. सविता मेनकुदळे यांनी, मानपत्राचे वाचन प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार संस्थेचे सहसचिव राजेंद्र साळुंखे यांनी मानले.

# गव्हाण विद्यालयाच्या रिद्धेशला पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ भगत ज्युनिअर कॉलेजमधील इयत्ता आठवीचा विद्यार्थी रिद्धेश कांतीलाल नाईक या विद्यार्थ्यास पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये शेकडा ४८.९९% गुण प्राप्त झाले असून रायगड जिल्ह्यात ११७ वा क्रमांकाने उत्तीर्ण होऊन शिष्यवृत्तीसाठी तो पात्र ठरला आहे.

जुलै २०२२ च्या शिष्यवृत्ती परीक्षेचा अंतिम निकाल जाहीर नुकताच झाला असून त्या इयत्ता- आठवी शिष्यवृत्ती परीक्षा (पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा ) मध्ये विद्यालयाचा रिद्धेश कांतीलाल नाईक हा विद्यार्थी उत्तीर्ण झाला असून रायगड जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत ११७ क्रमांक मिळवून शिष्यवृत्ती धारक ठरला आहे.



त्याचे अभिनंदन शाळेचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले सर, पर्यवेक्षिका . विशाखा मोहिते मॅडम, लाईफ वर्कर सौ. जोस्त्ना ठाकूर मॅडम, इयत्ता आठवी शिष्यवृत्ती प्रमुख सौ. वर्तक डी. आर., क्रीडा प्रमुख जयराम ठाकूर सर आदीच्या उपस्थितीत त्याचे अभिनंदन करण्यात आले. तसेच त्याला या परीक्षेसाठी मार्गदर्शन करणाऱ्या विभाग प्रमुख व विषय शिक्षिका सौ. वर्तक डी. आर., श्रीम. माळी मॅडम, श्री. भोईर एस. के. सौ. पाटील एच. आर. या सर्वांचे ही अभिनंदन करण्यात येत आहे .न्हावा शेवा पोलिस ठाण्याचे सहायक पोलिस निरीक्षक शांताराम गंगाधर लेंडे, महिला पोलीस हवालदार सौ के.के.नाईक, ए.पी.आय.अमोल बाळासाहेब शिंदे यांच्या हस्ते रिद्धेश कांतीलाल नाईक यांचा या यशाबद्दल सत्कार करण्यात आला.

# ऑडी गाडीमधील हत्येचा उलगडा

## पुण्यातून आरोपी ताब्यात ■ पनवेल गुन्हे शाखा कक्षची कारवाई



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील तारा गावाच्या हद्दीत दीड महिन्यापूर्वी काही अज्ञात व्यक्तींनी अज्ञात कारणावरून एका व्यक्तीची हत्या करून त्याचा मृतदेह ऑडी गाडी ठेवून ते पसार झाले होते. याप्रकरणी गुन्हे शाखा कक्ष २ पनवेलच्या पथकाने सातत्याने पाठपुरावा करून या गुन्ह्यातील दोन आरोपींना पकडले असून ही हत्या सोन्याच्या देवाणघेवाणी वरून झाल्याची प्राथमिक माहिती मिळाली आहे.

मुंबइ-गोवा महामार्गावर तारा गावाच्या हद्दीत पुणे येथील व्यापारी व नामचीन गुंड संजय कार्ले यांची अज्ञातांनी हत्या करून त्याचा मृतदेह ऑडी गाडीमध्ये ठेवून पसार झाले होते. पुणे येथील इसमाचा पनवेल हद्दीत हत्या झाल्याने तालुक्यासह गुन्हेगारी क्षेत्रात खळबळ उडाली होती. या प्रकरणामध्ये हत्येच्या कारणासह आरोपींना शोधण्याचे मोठे आवाहन गुन्हे शाखा कक्ष २ पनवेल समोर होते.


वरिष्ठ पोलीस निरीक्षक रवींद्र पाटील यांच्या नेतृत्वाखाली सहाय्यक निरीक्षक प्रवीण फडतरे, संदीप गायकवाड, पोलीस उपनिरीक्षक वैभव रोंगे, मानसिंग पाटील, सुदाम पाटील, हवालदार प्रशांत काटकर, सचिन पवार, दीपक डोंगरे, रणजित पाटील, अनिल पाटील, मधुकर गडगे, तुकाराम सूर्यवंशी, अजित पाटील, जगदीश तांडेल, ज्ञानेश्वर वाघ, इंद्रजित कानू, रुपेश पाटील, निलेश पाटील, राहुल पवार, सागर रसाळ, नाईक अजिनाथ फुंदे, प्रफुल्ल मोरे, नंदकुमार ढगे, अभय मेऱ्या, शिपाई संजय पाटील, विक्रांत माळी आदींची पथके तयार करण्यात आली.

या प्रकरणी शोध घेत असताना हत्या झालेली व्यक्तीचे नाव संजय कार्ले असून तो पुणे जिल्ह्यातील नामचीन गुंड असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्याच्यावर बनावट सोन्याची नाणी विकल्या प्रकरणी गुन्हा दाखल असून मोक्का लावण्यात आल्याचे पोलिसांना समजले. यांनतर पोलिसांनी मुंबई-गोवा महामार्गावरील हॉटेल, रिसॉर्ट व सीसीटीव्ही फुटेज तपासणी तसेच गोपनीय माहितीवर व तांत्रिक तपासद्वारे ही हत्या सराईत आरोपी असलेले मोहसीन मुलाणी (वय ३७) आणि अंकित कांबळे (वय २९) यांनी केल्याचे समजले.

या दोघांचा शोध घेत असता आरोपी हे नेपाळ येथे पळून गेल्याचे समजले, मात्र पोलीस या दोघांचा माग काढत होते. अखेर आरोपींपैकी एकजण देहूरोड पुणे येथे आल्याचे समजताच गुन्हे शाखा कक्ष २च्या पथकाने झडप घालून मोहसीन मुलाणी याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे एक पिस्तूल व तीन काडतुसे पोलिसांना आढळून आली. त्यांनतर पोलिसांनी अंकित कांबळे यालादेखील ताब्यात घेतले. त्यांना पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलीस सूत्रांकडून सांगण्यात आले आहे. या दोघांच्या अटकेमुळे अजूनही काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

## निवडक

### अल्पवयीन मुलगी बेपत्ता



**पनवेल :** तालुक्यातील पडघेगाव येथील राहत्या घरातून अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याने ती हरवल्याची तक्रार तळोजा पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे. बेपत्ता मुलीचे नाव राधिका वर्मा असून तिचे वय १६ वर्षे आहे. या मुलीचा रंग सावळा, चेहरा गोल, उंची पाच फुट, नाक-सरळ, केस काळे, नाकात डाव्या बाजूस चमकी, तसेच अंगात हिरवा टॉप व लेगीन्स घातली आहे. पायात चप्पल घातलेली आहे. या मुलीला हिंदी, भोजपुरी, मराठी अवगत असून या मुलीबाबत कोणाला काही माहिती असल्यास तळोजा पोलीस ठाणे किंवा पोलीस उपनिरीक्षक बळीराम घंटे यांच्याशी संपर्क साधावा.

### पनवेलमधून डिझेलची चोरी

**पनवेल :** पनवेल शहरातील मार्केट यार्ड येथील कल्पतरू सोसायटीसमोर उभ्या असलेल्या ट्रकच्या टाकीचे लॉक तोडुन अज्ञात व्यक्तीने ३०० लिटर डिझेलची चोरी केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुरेश गायकवाड याने त्याच्या ताब्यातील ट्रक (केएल ०८ बीक्यु ४०३०) हा मार्केट यार्ड येथील कल्पतरू सोसायटीसमोर पार्क करून ठेवला होता. अज्ञात व्यक्तीने या ट्रकमधील डिझेल टाकीचे लॉक तोडुन त्यामध्ये असलेले २६४०० रुपये किमतीचे ३०० लीटर डिझेल चोरून नेले. याप्रकरणी शहर पोलीस ठाण्यात अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### मोटरसायकलची चोरी

**पनवेल :** शहरातील फडके नाट्यगृहाच्या पाठीमागील रोडवर पार्क केलेली मोटरसायकल अज्ञात व्यक्तीने चोरून नेल्याची या बाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात नोंदवण्यात आली आहे. योगेश पांडुरंग जाधव यांनी त्यांच्या मालकीची काळ्या निळया रंगाची हिरो कंपनीची पॅशन प्रो मोटरसायकल (एमएच ४६ एटी ३१८६) ही आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाच्या पाठीमागील रोडवर पार्क केली होती, मात्र अज्ञात चोरट्याने ही मोटरसायकल चोरून नेल्याने याबाबतची तक्रार शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

### अपघातामध्ये कारचे नुकसान

**पनवेल :** शहरातील गार्डन हॉटेलजवळील सिग्नल ते पनवेल कोर्टाकडे जाणाऱ्या रस्त्यावर एका मोटरसायकल स्वाराची कारला ठोकर बसली. झालेल्या अपघातात कारचे नुकसान झाले आहे. विठ्ठल मोतीराम जाधव हे आपल्या ताब्यातील इनोव्हा कार (एमएच ४६ बीई ४४०५) घेऊन गार्डन हॉटेलजवळील सिग्नल ते पनवेल कोर्टाकडे जाणाऱ्या रस्त्यावर जात असताना मोटरसायकल (एमएच ३७ एई ५७९७) वरील चालक भिमराव चव्हाण याची कारला ठोकर बसली. या अपघातात कारचे नुकसान झाले. या अपघाताची नोंद शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.



**रसायनी : मोहोपाडा रिक्षा स्टँड येथे रस्त्यालगत भाजीपाला विकायला बसतात. यामुळे वाहतूक कोंडी होते. मोहोपाडा ग्रामपंचायतीने यावर कारवाई करावी व त्यांना तेथे बसण्यास मनाई केली पाहिजे. भविष्यात जर मोठा अपघात झाला तर त्याला जबाबदार कोण, असा प्रश्न निर्माण झाला आहे.** (छाया : बी. एस. कुलकर्णी)

# श्रमसंस्कार शिबिराचा भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते प्रारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जे लोकांच्या उपयोगी पडतात त्यांचे आदर्श घ्या असा मोलाचा सल्ला भाजपचे तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी श्रमसंस्कार शिबिराच्या उद्घाटनावेळी विद्यार्थ्यांना दिला. रयत शिक्षण संस्थेच्या पनवेलमधील महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून 'विशेष श्रम संस्कार शिबिर' आयोजित करण्यात आले आहे.

युवकांचा ध्यास: ग्राम शहर विकास यासंदर्भात आयोजीत करण्यात आले हे शिबीर शांतीवन येथे ४ ते १० जानेवारी दरम्यान होणार आहे. या श्रम संस्कार शिबीराचे रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॅडी सदस्य तथा भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्याहस्ते बुधवारी उद्घाटन झाले.

या वेळी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत, प्रा. धनंजय कोकीळ, प्रा. लक्ष्मण राठोड, प्रा. डॉ. किर्ती म्हात्रे यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

# गव्हाण विद्यालयात 'रेजिंग डे' साजरा; पोलिसांचे मार्गदर्शन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये 'रेझिंग डे' निमित्त न्हावा-शेवा पोलीस ठाण्यातील पोलिस अधिकाऱ्यांनी विशेष मार्गदर्शन केले.

न्हावा शेवा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक शांताराम गंगाधर लेंडे यांनी अमली पदार्थ, व्यसनमुक्ती या विषयावर विद्यार्थ्यांना माहिती दिली. त्याचप्रमाणे महिला पोलीस हवालदार के. के. नाईक यांनी सायबर गुन्ह्याबद्दल जनजागृती करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. ए. पी. आय. अमोल बाळासाहेब शिंदे यांनीही विशेष मार्गदर्शन करून अंमली पदार्थांच्या विळख्यात अडकलेल्या तरुण पिढीला त्यातून बाहेर काढण्यासाठी त्याचप्रमाणे सायबर गुन्ह्याबद्दल माहिती, व्यायामाचे महत्त्व विशद केले व व्यावसाय मार्गदर्शनही केले.

या वेळी विद्यालयाचे उपमुख्याध्यापक प्रमोद मंडले, पर्यवेक्षिका विशाखा मोहिते, ज्युनिअर कॉलेज विभाग प्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे, विद्यालयाचे क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर, देवेंद्र म्हात्रे, प्रा. राजू खेडकर आणि विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आर. एस. पी. नवी मुंबईचे समादेशक देवेंद्र म्हात्रे यांनी केले.



**उरण : भाजपच्या राजश्री प्रमोद म्हात्रे यांची पिरकोन ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी निवड झाल्याबद्दल त्यांनी आमदार महेश बालदी यांची भेट घेतली. आमदार बालदी यांनी उपसरपंच राजश्री म्हात्रे यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य अनिता नितीन गावंड यांचेही अभिनंदन केले. या वेळी उरण पूर्व विभाग अध्यक्ष शशिकांत पाटील, उद्योगपती देवेंद्र म्हात्रे, चिरनेर पंचायत गणप्रमुख प्रशांत ठाकूर, युवा नेते धनेश गावंड, प्रा. प्रमोद म्हात्रे, सुशांत व उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड उपस्थित होते.**



**पनवेल : महापालिका क्षेत्रातील भिंगारी येथील प्राथमिक शाळेत चार वर्ग खोल्या बांधण्यात येणार आहेत. महापालिका क्षेत्रात मुलभूत सोयी-सुविधा विकासासाठी विशेष तरतूद योजनेंतर्गत आणि महापालिकेच्या निधीमधून भिंगारी येथील प्राथमिक शाळेत चार वर्ग खोल्या बांधण्यात येणार आहेत. या कामाचे भूमिपूजन बुधवारी गणेश घरत यांच्या हस्ते झाले. या वेळी ज्येष्ठ नेते शंकर म्हात्रे, अशोक परदेशी, गणेश घरत, विशाल घरत, रूपेश परदेशी, सुरज परदेशी, किरण मढवी, सागर गायकवाड यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.** (छाया : संकेत भोईर)



**कामोठे : सुषमा पाटील विद्यालय आणि ज्युनियर कॉलेज कामोठे व श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या १०व्या कला, क्रीडा आणि सांस्कृतिक कार्यक्रमाचे उद्‌घाटन पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी सुषमा पाटील विद्यालयाचे चेअरमन दिलीप पाटील, डॉ. मंदार पनवेलकर, विठोबा गायकर, अतुल गोवारी, अर्जुन गोवारी, गोपीनाथ गोवारी, गोरखनाथ पोळ आदी उपस्थित होते.**



**उरण : नवीन वर्षानिमित्त आमदार महेश बालदी यांना दिघाटीचे माजी सरपंच व विद्यमान सदस्य अमित पाटील, माजी उपसरपंच दत्ताशेठ पाटील, ज्येष्ठ नेते चांगाजी पाटील यांनी शुभेच्छा दिल्या.**

# सीकेटी विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण



**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसाकर संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय, इंग्रजी माध्यमिक विभागाचा पारितोषिक वितरण सोहळा बुधवारी (दि. ४) झाला.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून जगदिश घरत (शक्तीकेंद्र प्रमुख आणि फाउंडर मेंबर ऑफ रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्टस कॉम्लेक्स), ऋग्वेद कांडपिळे (फाउंडर स्नेहदीप फाउंडेषन तसेच प्रेसिडेंट रोटरी क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रियल टाऊन), भाऊसाहेब थोरात (सहसचिव जनार्दन भगत षिक्षण प्रसारक संस्था) आदी उपस्थित होते.

शैक्षणिक, कला, क्रिडा अशा अनेक क्षेत्रात नैपुण्य मिळवलेल्या विद्यार्थ्यांना या वेळी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित केले गेले. सरस्वती पूजन आणि दीपप्रज्वलनानंतर विद्यालयाच्या गायकवृंदाने सुमधुर स्वागत गीत गाऊन पाहुण्यांचे स्वागत केले.

कार्यक्रमाची प्रस्तावना करताना मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी पारितोषिक प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. सहसचिव भाऊसाहेब थोरात यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून सातत्याने प्रयत्न करणाऱ्या विद्यार्थ्यांना कवितेच्या माध्यमातून मार्गदर्षन करताना खचून जावू नका, गुणी विद्यार्थ्यांनो - सद्गुणी व्हा! असा मोलाचा संदेष दिला.

सीकेटी शैक्षणिक संकुलातील सर्व विभाग प्रमुख तसेच तेजश्री कुलकर्णी- शिक्षक पालकसंघ उपाध्यक्ष, मोहिनी जाधव - षिक्षक पालकसंघ सह सचिव, प्रो. प्रज्ञा पवार या सर्वांच्या उपस्थितीत हा सोहळा झाला.

# 'सीकेटी'त उद्या स्नेहसंमेलन

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसाकर संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालय, इंग्रजी माध्यमिक विभागाचे २७वे वार्षिक स्नेहसंमेलन 'भारत एक खोज' या आशयाखाली शुक्रवारी (दि. ६) होणार आहे.

पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कन्सल्टंट, ट्रेनर, कोच विधी शर्मा या असणार आहेत.

तसेच विशेष पाहुणे म्हणून माजी विद्यार्थी डॉ. अपेक्षा मते, डॉ. भूषण साखरदांडे, सीए प्रियंका पुरोहित यांची उपस्थिती असेल. यासोबतच प्रमुख मान्यवर पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक अनिल भगत, तेजस कांडपिळे, ॲड. मनोज भुजबळ, संस्थेचे सचिव डॉ. एस. टी. गडदे, सहसचिव भाऊसाहेब थोरात हे आहेत.

विविध कार्यक्रमाचे नियोजन सेक्शन को-ऑरडिनेटर अदुरी लक्ष्मी निरजा व मुख्यसध्यापक संतोष चव्हाण यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी करणार आहेत.

## संपादकीय

# मराठी तितुका मेळवावा

जगभरातील मराठीजनांनी एकत्र येऊन मराठी भाषेची गोडी वाढवावी या हेतूने महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या मराठी विश्व संमेलनाचे बुधवारी शानदार उद्घाटन झाले. 'मराठी तितुका मेळवावा' या आशयाखाली तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनात मराठी भाषा, संस्कृती, परंपरांचा वैश्विक गजर होत आहे. आपल्यासाठी ही अभिमानास्पद बाब म्हटली पाहिजे.

**लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी..., जाहलो खरेच धन्य ऐकतो मराठी..., धर्म, पंथ, जात एक जाणतो मराठी..., एवढ्या जगात माय मानतो... कवी सुरेश भट यांची ही रचना वाचली, ऐकली की तमाम मराठीजनांचा ऊर अभिमानाने भरून येतो. मराठी भाषा मुळी आहेच सुंदर आणि तितकीच गोड. आपल्या या मराठी भाषेचा सर्वांगीण प्रचार व प्रसार वैश्विक स्तरावर होण्यासाठी तसेच मराठीतून संवाद करण्याची रूची निर्माण करण्यासाठी, दैनंदिन वापरामध्ये मराठी भाषेचा अधिकाधिक वापर करण्यासाठी जनतेला प्रोत्साहित करण्याकरिता राज्य शासनाच्या मराठी भाषा विभागातर्फे आणि सांस्कृतिक कार्य व उद्योग विभागाच्या सहकार्याने विश्व मराठी संमेलन मुंबईतील वरळी येथे आयोजित करण्यात आले आहे. याचे उद्घाटन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मराठमोळ्या पद्धतीने झाले. विशेष बाब म्हणजे जगाच्या पाठीवरील प्रत्येक खंडातील, विविध देशांमधील आणि देशाच्या विविध राज्यांतील सुमारे १५०० मराठी बंधू-भगिनी या संमेलनासाठी आवर्जून उपस्थित राहिले. संमेलनाच्या तीनही दिवशी भरगच्च कार्यक्रमांची पर्वणी आहे. यामध्ये चर्चासत्रे, परिसंवाद, परदेशातील मराठी जनांचे अनुभवकथन, ग्रंथ प्रदर्शन यासह सांस्कृतिक कार्यक्रम, नाटक, लावणी, लोकसंगीत, लेझीम, ढोल, ताशांसारखे मराठी पारंपरिक खेळ, वाद्यमहोत्सव यांचाही समावेश आहे. मराठी साहित्य, कला, संगीत या सर्व सांस्कृतिक अंगांचा परामर्ष घेणे हाही संमेलनाच्या आयोजनाचा हेतू आहे. या संमेलनाच्या निमित्ताने विविध उद्योग महाराष्ट्रामध्ये यावेत याकरिता गुंतवणूकदार व उद्योजक यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी ६ जानेवारी रोजी महाराष्ट्रात गुंतवणूक करणारे मराठी उद्योजक व गुंतवणूकदार यांचा परस्पर संवाद सह्याद्री अतिथीगृह येथे होणार आहे. एकूणच तीन दिवस मराठीजनांसाठी पर्वणी आहे. मंडळी, मराठी माणसांना या भाषेची थोरवी माहीतच आहे. संत ज्ञानेश्वर माऊलींनी, माझा मराठीची बोलू कौतुके। परि अमृतातेहि पैजासी जिंके। ऐसी अक्षरे रसिके। मेळवीन।। अशा शब्दांत मराठीचे वर्णन केले आहे. मराठी भाषा ही आपल्या महाराष्ट्र राज्याची अधिकृत राजभाषा आहे. २७ फेब्रुवारी हा दिवस मराठी भाषेतील ज्ञानपीठ पुरस्कार विजेते कवी, लेखक विष्णू वामन शिरवाडकर म्हणजेच सर्वांचे लाडके कवी कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस. हा मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. या दिवशी एकमेकांना शुभेच्छा दिल्या जातात. मराठी संदेशांचा समाजमाध्यमांवर पूर येतो. एरवी मात्र मराठीबाबत नागरिकांमध्ये निरूत्साह असतो. तो असा की अनेकदा मराठी लोक अकारण इतर भाषांतून संभाषण करतात. जिथे गरज आहे तिथे ती ती भाषा जरूर वापरली पाहिजे, पण जिथे मराठी बहुसंख्येने बोलली जाते तिथे याच भाषेचा आग्रह धरला पाहिजे. या संमेलनाच्या माध्यमातून सक्षम, संपन्न आणि समृद्ध वैश्विक मराठी प्रतिमा निर्माण करण्यासाठी वैश्विक मराठी व्यासपीठ मिळेल तसेच मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळण्यास मदत होईल अशी आशा करूया!**

# पर्यावरण, पर्यटनक्षेत्र आंबेनळी घाटाची डागडुजी



**खबरबात**
**शैलेश पालकर**

रायगड आणि सातारा जिल्ह्यांना जोडणारा आंबेनळी घाट ४ जानेवारी २०२३ रोजी दुरूस्ती कामासाठी बंद राहिल्याने या अनुषंगाने या घाटाच्या इतिहासाची पाने चाळविण्याची गरज भासू लागली. पोलादपूर ते महाबळेश्वरदरम्यान शिवकालीन डुक्करसोंडीचा घाट, त्यानंतरचा रडतोंडीचा घाट, ब्रिटीशकालीन फिटझगेराल्ड घाट आणि सद्यस्थितीत सर्वपरिचित आंबेनळी घाट असे नामांतर झालेल्या या रस्त्यावर २३ जुलै २०२१ रोजी झालेल्या ढगफुटीसदृश्य पावसामुळे ठिकठिकाणी डोंगरउतारावरून मोठमोठ दगड आणि मातीचा गाळ पावसाच्या पाण्याच्या लोटासोबत कोसळून मोऱ्यांचे तसेच रस्त्याचे अपरिमित नुकसान झाले. त्यानंतर तब्बल दोन महिन्यांनी प्रथम रायगड विभागाकडून एकेरी वाहतुकीसाठी रस्ता खुला करण्यात आला आणि घाटरस्ता दुरूस्तीचे काम सार्वजनिक बांधकाम विभाग महाबळेश्वरकडून सुरू राहिले.

सद्यस्थिती पार फाट्यापासून महाबळेश्वरलगतच्या मेटतळे गावापर्यंतच्या घाटरस्त्यातील मोऱ्यांच्या कामात रस्ता फोडून काँक्रीटचे पाईप जमिनीमध्ये गाडण्याचे काम बुधवारी आठ तासात युध्दपातळीवर करण्यात येणार असून यामुळे पोलादपूर ते प्रतापगडपर्यंत वाहतूक सुरू राहणार असली तर पार फाट्यापासून महाबळेश्वरपर्यंत वाहतूक सुरू राहणार नसल्याने संपूर्ण आंबेनळी घाटातील वाहतूक बंद करून आंबेनळी घाटाची डागडुजी करण्याचा निर्णय महाबळेश्वर सार्वजनिक बांधकाम विभागाच्या उपअभियंत्यांना घ्यावा लागला. याआधी झालेले आंबेनळी घाटाचे दुरूस्ती काम रायगड विभागातील ठेकेदारांनी नैसर्गिक आपत्ती निवारणातून केल्यानंतर आता या घाटाची दुरूस्ती ही एकाच दिवसातील आठ तासांमध्ये घाटरस्ता फोडून रस्त्यामध्ये मोरीचे काँक्रीट पाईप टाकण्यासाठी केली जात आहे. यामुळे या आधी अनेकदा नैसर्गिक आपत्तीमुळे मेगाब्लॉक झालेल्या या घाटामध्ये आता दुरूस्ती कारणामुळे मानवनिर्मित मेगाब्लॉक घेतला जाणार आहे.

पोलादपूर ते महाबळेश्वर दरम्यान सुमारे ३२ कि.मी. अंतराचा फिटझगेराल्ड म्हणजेच सध्याचा सर्वशृत आंबेनळी घाट पोलादपूर तालुक्यातील कापडे खुर्द येथून सुरू झाला आहे. पूर्वी शिवकाळात महाबळेश्वरपर्यंत अथवा त्याहीपुढे जाण्यासाठी महाडच्या अग्नेय दिशेने माझेरी, वरंध, शिवथरघळ, पिंपळवाडी असा २४ कि.मी.चे सह्याद्री पर्वतराजीतून मार्गाक्रमण करून पोलादपूर तालुक्यातील किनेश्वर गावाजवळ पार घाट सुरू होत असे. या मार्गाला आजही शिवाजी रस्ता म्हटले जाते. त्याकाळी महाड ही तरत्या बंदराची उतारपेठ होती. महाड तालुक्याला पोलादपूर पेट्याचा मुलूख १९४८ सालापर्यंत जोडला होता. ब्रिटीशांनी पोलादपूरला महाल कचेरी ठेवली होती. स्वातंत्र्यानंतर १९५८ साली पोलादपूर हा स्वतंत्र तालुका अस्तित्वात आला. पण तत्पूर्वी १८२६ पर्यंत पार घाट हाच शिवकालीन मार्ग सातारा, वाई, कराडपर्यंत वाहतूकीसाठी वापरात येत होता. महाडच्या तरत्या बंदराच्या उतारपेठेतून मीठ, सुकी मासळी, नारळ, विड्याची पाने आदी सामानाची वाहतूक पार घाटामार्गेच वर्षानुवर्षे होत असे, मात्र आजचे थंड हवेचे ठिकाण महाबळेश्वर शिवकाळात दंडकारण्यातील श्रीक्षेत्र महाबळेश्वर असे परिचित होते. पार घाटातून १८२६ पूर्वी महाबळेश्वरला जाणारी पायवाट होती. येथून बंजारा लोक मीठ आणि धान्याची वाहतूक करीत. पारघाटातून येणाऱ्या व जाणाऱ्या मालावर घाटाच्या देखभालीसाठी जकात आकारली जात असे. आझ्याच्या बैलासाठी १ रूका, धान्य,भूसा व मिठाच्या गोणीसाठी ३ रूके, तंबाखू व उडीद ६ रूके, कापड बंगी पाव रूका आणि कांबळे (ब्लँकेट) ओझे ९ रूके असे जकातीचे स्वरूप शिवकाळात होते.

पारघाटाला रडतोंडीचा घाट हा पर्यायी मार्ग होता. याखेरिज, भोर संस्थानापासून कामथे आणि ढवळे घाट वाटसरूंसाठी वापरात होते. मात्र, हा घाट दूर्गम व अवघड असल्याने येथून मालवाहतूक कठीण होती. सातारा, वाईशी कमी अंतरात पोहोचण्याचा हा मार्ग बिकट तर होताच पण या मार्गाची डागडुजी, देखभाल दुरूस्ती करण्यासाठी खुपच खर्च झाला. तरीही ब्रिटीशांना घोडागाडी अथवा मोटारगाडीसाठी उपयुक्त मार्ग तयार करण्याची आवश्यकता भासू लागल्याने पार घाटाच्या उत्तरेस ०.८१ कि.मी. अंतरावर कापडे खुर्द गावाजवळ नव्याने घट बांधला. या घाटाला फिटझगेराल्ड म्हणत. हाच सध्याचा आंबेनळी घाट होय. या घाटाच्या उभारणीस १८७१ साली सुरूवात होऊन केवळ ४ लक्ष ४४ हजार रूपये खर्च झाला. हा घाट पाचच वर्षात वाहतुकीस खुला होऊन १८७६ सालापासून ब्रिटीश आणि व्यापारी घोड्याला लगाम न लावता कापडे खुर्दपर्यंत उतरत असत. या घाट उभारणीच्या काळातच श्रीक्षेत्र महाबळेश्वरचा गिरिस्थान थंड हवेचे ठिकाण म्हणून ब्रिटीशांनी विकास केला.

शिवकाळात रायगडावरून निघाल्यावर समर्थ रामदासस्वामींचे दर्शन शिवथरघळीत घेतल्यानंतर पिंपळवाडीपासून महादेवाचा मुरा व तेथून सह्याद्रीच्या रांगांमधून थेट कांगोरीगडावर जात. शिवरायांनी हा गड हिंदवी स्वराज्यात आल्यावर त्याचे नांव मंगळगड ठेवले. तेथून पुढे ढवळागड म्हणजेच चंद्रगडावर विश्रांती आणि पारच्या देवीचे दर्शन. त्यावेळी पारला पार्वतीपूरही म्हणत असत आणि तिथे तुळजापूरची भवानीमाता हीदेखील रामवरदायिनीदेवी समवेत वास्तव्यास असे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अफजलखानाच्या वधानंतर या भवानीमातादेवीला खानाचा रूधिर टीळा लावल्याचा उल्लेख आहे. पुढे शिवरायांनी प्रतापगडावर म्हणजेच अफजलखानाच्या वधापूर्वीचा गुऱ्हागड येथे तुळजाभवानीची स्थापना केल्यानंतर देवळे येथील चित्रे कुटूंबाची रामवरदायिनी देवी कापडे बुद्रुक येथे पूजली जाऊ लागली. महिपतगड, कोंढवीगड, तानाजी मालुसरेंचे जन्मस्थान उमरठ गांव, सूर्याजी मालुसरेंची समाधी साखर ही शिवकालीन सृष्टी केवळ ब्रिटीशांनी फिटझगेराल्ड म्हणजे आंबेनळी घाट उभारल्यानंतर दृष्टीआड गेली आहे. त्यामुळे पोलादपूर ते महाबळेश्वरपर्यंत ऐतिहासिक व पर्यावरण पर्यटन क्षेत्र (इको टूअरीझम) घोषित करून या मार्गाचा सुनियोजित विकास केल्यास या भागाचे महत्व वाढेल. मात्र, या परिसरातच इको सेन्सेटीव्ह झोन निश्चित करण्यात येऊन

कापडे बुद्रुक येथील रामवरदायिनी देवीचे दर्शन घेतल्यानंतर आंबे, फणस, काजू, जांभळं, तोरणं, आळू, आसाणे असा फळे व रानमेव्याचा स्वाद घेत डोंगर झाडीतून वनभ्रमंती करण्यासाठी कुंभळवणे, पायटेवाडीपासून सुरूवात केल्यास घोडवती नदीच्या चिंचोळ्या उथळ पात्रातून पर्यटकांना आगळावेगळा आनंद मिळतो. तेथून पुढे दाभिळटोक भागात दऱ्यांत डोकाविताना आपण पक्षी होऊन विहंगम संचार करीत असल्याचा भास होतो. येथून काश्मीरी पहेलगामसारखे वाटीसदृश्य भागात वसलेले आदर्शगाव ढवळे इवलेसे दिसते.

आंबेनळी घाटात निसर्गसहवासाने तृप्त होताना तृषार्तही झाल्याची जाणीव होते. सध्या महाबळेश्वर गिरिस्थान थंड हवेचे ठिकाण पाहण्यासाठी जाणाऱ्या पर्यटकांची तसेच सातारा, वाई, कराड, कोल्हापूरपर्यंत जाणाऱ्या प्रवाशांची वाहतूक आंबेनळी घाटात मोठ्या प्रमाणात होते. हा संपूर्ण घाटरस्ता दूर्गम आणि त्याभोवतीच्या दऱ्या खूपच खोल असूनही या घाटात डोंगराच्या बाजूने रस्त्यावर कोसळणारे मातीचे दरडीचे ढिगारे दोन तीन वर्षे हलविले गेल्याने घाटरस्ता कसाबसा दुपदरी म्हणावा इतका अरूंद झाला आहे. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला संरक्षक कठडे नसल्याने वाहने कोसळून अनेकांचे जीवन संपुष्टात आले आहे. परिणामी, महाबळेश्वरला मुंबईचे पर्यटक आता मुंबई ते पुणे द्रुतगती महामार्गावरून व त्यानंतर पुणे ते वाईमार्गे पसरणी घाटातून जाऊ लागले, मात्र तो पसरणी घाट यापेक्षाही अधिक असुरक्षित असल्याचे गुजरात राज्यातील एक आरामगाडी उलटून अनेक कुटूंबे दगावल्याने स्पष्ट झाले. पोलादपूर ते महाबळेश्वर या मार्गावरही दरवर्षी अलिशान गाड्यांचे अपघात झाले आहेत. त्यात प्रत्येकवेळी किमान पाच ते सात प्रवासी ठार झाले आहेत. अलिकडेच, येथे दापोली येथील डॉ. बाळासाहेब सावंत कृषी विद्यापिठाच्या बसला अपघात होऊन तब्बल ३० जण दगावले असल्याने भविष्यात तसा धोका निर्माण होणार नाही, यासाठी खबरदारी घ्यावी लागणार आहे.

पोलादपूर ते महाबळेश्वरदरम्यान सुमारे ३२ कि.मी. अंतराचा फिटझगेराल्ड म्हणजेच सध्याचा सर्वशृत आंबेनळी घाट हा नजिकच्या काळात ऐतिहासिक व पर्यावरण पर्यटन क्षेत्र म्हणून विकसित करण्याचे स्वप्न साकारण्याचे प्रयत्न युध्दपातळीवर सुरू होतील, अशी मागणी आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# चॅट जीपीटीद्वारे अनुभवा गुगलची पुढची पायरी

अलीकडच्या काळात अनेक नवीन शब्द, नव्या संकल्पना वेगाने चर्चेत आणि प्रत्यक्ष वापरात येतात. अशा काही नव्या संकल्पनांचे संदर्भासह स्पष्टीकरण करणाऱ्या या नव्याकोऱ्या लेखमालेतला पहिला शब्द : चॅट जीपीटी! विचार करा, तुम्हाला तुमच्या सहकाऱ्याचे कौतुक करणारे एक पत्र लिहायचे आहे किंवा त्याच्यावर एक कविता करायची आहे, पण तुम्हाला शब्द सुचत नाहीयेत. तुम्ही काय कराल? अर्थातच एखाद्या लेखक किंवा कवीमित्राला गळ घालाल. मात्र, आता तसे काही करण्याची गरज नाही. एका क्लिकवर पत्र, कविता, कथा, एवढेच काय ऑफिशिअल मेलही तुम्हाला तयार करून मिळेल. - कुठे? चॅट जीपीटीवर...!




चॅट जीपीटी हे गुगललाही मात देऊ शकेल असे नवे तंत्रज्ञान आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेचा (आर्टिफिशियल इंटिलिजन्स) वापर करून तयार करण्यात आलेल्या या तंत्रज्ञानाची गंमत अशी की, यात तुम्हाला हव्या असलेल्या विषयाची संपूर्ण माहिती संगणकाच्या पडद्यावर झळकते. तुम्ही प्रश्न विचारा. त्याची अचूक उत्तरे चॅट जीपीटी तुमच्यासमोर सादर करते. अगदी त्या विषयाचा तपशील आणि मागच्या-पुढच्या संदर्भासहित. गुगल केवळ संबंधित विषयाच्या विविध लिंक्स तुम्हाला सादर करते. चॅट जीपीटी ही त्या पुढची पायरी आहे.

गेल्याच महिन्यात हे तंत्रज्ञान अवतीर्ण झाले. अवघ्या महिनाभरात दहा लाखांहून अधिक युझर्सनी त्याचा वापर केला. इलॉन मस्क आणि एआयवनचे सीईओ सॅम अल्टमन यांनी चॅट जीपीटी हे तंत्रज्ञान विकसित केले आहे. एआयवनच्या संकेतस्थळावर जाऊन ट्राय चॅट जीपीटी असे सर्च करून या तंत्रज्ञानाचा वापर करता येतो.

अमुक एखाद्या विषयाची माहिती विचारल्यास चॅट जीपीटी त्यासंदर्भातील इत्थंभूत माहिती तुमच्यासमोर ठेवते. तुम्ही एखादा चुकीचा प्रश्न विचारलात तर तेही तुमच्या लक्षात आणून देते. तुम्हाला मजकूर कवितारूपात हवा असेल तर तेही चॅट जीपीटीला सहज शक्य आहे. एखाद्या मित्राप्रमाणे चॅट जीपीटी तुमच्याशी गप्पा मारते. तुम्हाला हव्या त्या विषयावरील हवी ती माहिती अचूकपणे उपलब्ध करून देते. तूर्त हे तंत्रज्ञान प्रायोगिक तत्त्वावर सुरू आहे. येत्या काळात गुगलला ते पर्याय ठरू शकते. कथा, कविता, पटकथा, निबंध, बीजभाषणे इत्यादी साहित्य चॅट जीपीटीवरून सहज उपलब्ध होऊ शकते.

**-विनय उपासनी**

# मराठी साहित्यिक, कादंबरीकार श्री. ना. पेंडसे



**निमित्त**

श्रीपाद नारायण पेंडसे हे कथालेखक व कादंबरीकार होते. त्यांचा जन्म ५ जानेवारी १९१९ मध्ये रत्नागिरी जिल्ह्यातील मुर्डी या गावी झाला. १९२४ मध्ये पेंडसे मुंबईला स्थायिक झाले ते कायमचे. वयाच्या ११ व्या वर्षांपर्यंत त्यांनी जो कोकण पाहिला होता, आपल्या मनात साठवला होता, त्यावर ते आयुष्यभर लिहीत राहिले. मग तो साकव असेल, व्याघ्रेश्वराचे देऊळ असेल किंवा नारळी-पोफळीच्या बागा असतील. त्या त्यांच्या भावविश्वाचा अतूट भाग झालेल्या होत्या.

श्री. ना. पेंडसेंना खासगीत शिरूभाऊ म्हणत. खासगीतील (कौटुंबिक) हे नाव त्यांच्या मित्रमंडळीत आणि पुढे लेखनाच्या क्षेत्रातही रूढ झाले. त्यांच्या नावाचा उल्लेख साहित्य प्रांतातही 'पेंडसे' असा होण्याऐवजी 'शिरूभाऊ' असाच होत होता, याची प्रचीती 'श्री. ना. पेंडसे : लेखक आणि माणूस' या त्यांच्या आत्मचरित्रातूनही येते. मुंबईच्या बेस्ट कंपनीत सेवानिवृत्तीपर्यंत नोकरी करून या संस्थेच्या आत्मीयतेपोटी त्यांनी १९७२ मध्ये 'बेस्ट उपक्रमाची कथा' हे पुस्तकही लिहिले.

कादंबरी, कथा, नाटक, व्यक्तिचित्रण, आत्मचरित्र अशा विविध वाङ्यप्रकारात लेखन केलेल्या पेंडसेंची मराठी साहित्यात ओळख आहे ती कादंबरीकार म्हणूनच. श्री.ना.पेंडसे यांची 'जीवनकला' ही पहिली कथा १९३८ मधे प्रसिद्ध झाली. नंतर काही व्यक्तिचित्रे त्यांनी लिहिली.'खडकावरील हिरवळ' हे त्यांचे व्यक्तिचित्रणात्मक पुस्तक १९४१ साली प्रकाशित झाले. हे त्यांचे प्रकाशित झालेले पहिले आणि शेवटचे व्यक्तिचित्रणात्मक पुस्तक. 'जुम्मन' (१९६६) हा एकमेव कथासंग्रह सोडला तर त्यांनी नंतर कथालेखनही केले नाही. व्यक्तीचा शोध, व्यक्तिमनाचा समग्र विचार हे त्यांच्या लेखनामागील प्रधान सूत्र होते. त्यांना सुचलेल्या कादंबर्या या बहुतश: त्यांच्या आयुष्यातील त्यांनी पाहिलेल्या माणसांवरून सुचलेल्या आहेत.

'एल्गार'ने पेंडसेंना जसे कादंबरीकार म्हणून नाव मिळाले, तसेच या कादंबरीच्या निमित्ताने मराठीत प्रादेशिकतेच्या संदर्भात चर्चा झडू लागल्या. 'एल्गार' (१९४९) पाठोपाठ 'हद्दपार' (१९५०) आणि 'गारंबीचा बापू' (१९५२) या कादंबर्या प्रकाशित झाल्या आणि प्रादेशिक कादंबरीकार म्हणून पेंडसेंनी मराठी साहित्यात आपले वेगळे स्थान निर्माण केले. 'गारंबीचा बापू' ही तर तत्कालीन वाचकांना झपाटून टाकणारी, चेटूक करणारी कादंबरी ठरली. 'तुंबाडचे खोत' ही त्यांची गाजलेली कादंबरी होती.

सातत्य आणि प्रयोगशीलता हे कादंबरीकार म्हणून पेंडसे यांच्या प्रकृतीचे एक वैशिष्ट्य सांगता येईल. मधल्या काळात 'हत्या' (१९५४), 'यशोदा' (१९५७), 'कलंदर' (१९५९) या तीन कादंबर्या आणि 'यशोदा' व 'राजेमास्तर' ही दोन नाटके त्यांनी लिहिली. १९६२ मध्ये त्यांची 'रथचक्र' ही कादंबरी प्रकाशित झाली आणि कादंबरीकार म्हणून त्यांच्या यशात यानिमित्ताने मानाचा तुरा खोवला गेला. 'रथचक्र'ला १९६३ सालचा साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला.

'एक होती आजी' (१९९५), 'कामेरू' (१९९७), 'घागर रिकामी रे', 'रंगमाळी' (२००२), 'हाक आभाळाची' (२००७) या पेंडसेंनी आपल्या उत्तरायुष्यात लिहिलेल्या कादंबऱ्या होत. कादंबरी लेखनासोबतच पेंडसेंनी नाट्यलेखनही भरपूर केले आहे. 'राजेमास्तर', 'यशोदा', 'गारंबीचा बापू', 'असं झालं आणि उजाडलं' आणि 'रथचक्र' ही नाटके त्यांच्याच कादंबर्यांवर आधारित होती.

श्री. ना. पेंडसेंना त्यांच्या लेखनासाठी अनेक पुरस्कार मिळाले. त्यात महाराष्ट्र शासनाचे पाच पुरस्कार (हद्दपार, हत्या, कलंदर, संभूसाच्या चाळीत व चक्रव्यूह), साहित्य अकादमी पुरस्कार, महाराष्ट्र फाऊण्डेशनचा जीवनगौरव पुरस्कार, हे काही उल्लेखनीय पुरस्कार म्हणता येतील. अशा या श्रेष्ठ कादंबरीकाराचे २३ मार्च २००७ रोजी निधन झाले.

**(साभार : मायमहानगर)**

**क्लिक...क्लिक...!**



**अलिबाग : रायगड पोलीस दलातील शिपाई आणि चालकपदाच्या भरतीची प्रक्रिया मंगळवारपासून सुरू झाली. पहिल्या दिवशी चालकपदासाठी पुरुष व महिला उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी व मैदानी चाचणी घेण्यात आली.** (छाया : जितू शिगवण)

## आरोग्य प्रहर

# किडनी स्वस्थ ठेवायची असेल तर 'हे' पदार्थ खा

किडनी आपल्या शरीरातील एक महत्वपूर्ण अवयव आहे. ही शरीरात अनेक प्रकारची कामं करते. शरीरातील टाकाऊ घटक आणि अतिरिक्त द्रव पदार्थ बाहेर काढण्याचे काम किडनी करते. एका प्रकारे किडनी ही अशुद्धता फिल्टर करण्याचे कार्य करते. पण याच किडनीची योग्य प्रकारे काळजी न घेतल्यास आरोग्याशी संबंधित अनेक समस्याचा सामना करावा लागू शकतो. अनेक लोकांना किडनीशी संबंधित समस्या शेवटी कळतात, मात्र तोपर्यंत किडनी खराब होते. अशा परिस्थितीमध्ये किडनीची पूर्ण काळजी घेणे गरजेचे असते.



किडनीचे आरोग्य चांगले राखण्यासाठी हेल्दी पदार्थांचा आहारात समावेश करणे महत्वाचे ठरते. तुम्हालाही किडनीचे आरोग्य चांगले राखायचे असेल तर काही सुपरफूड्स तुम्ही रोजच्या आहारात समाविष्ट करू शकता.

**लाल सिमला मिरची** – लाल सिमला मिरचीमध्ये व्हिटॅमिन सी, व्हिटॅमिन ए तसेच व्हिटॅमिन बी ६, फॉलिक सिड आणि फायबर हे मुबलक प्रमाणात असतात. त्याच्या सेवनामुळे किडनी निरोगी राहते. तसेच लाल सिमला मिरची खाल्याने दृष्टी चांगली राहते.

**लसूण** – लसणाचा वापर भारतीय स्वयंपाकघरात सर्रास केला जातो. लसूण अनेक प्रकारच्या पदार्थांमध्ये वापरला जातो. लसणामध्ये मँगनीज, व्हिटॅमिन सी आणि व्हिटॅमिन बी ६ सारखे पोषक घटक असतात. ते किडनी निरोगी ठेवण्यास मदत करतात. यात अँटी-इन्फ्लेमेटरी गुणधर्म देखील असतात.

**कांदा** – कांदा पदार्थांना सोडियम फ्री फ्लेव्हर देण्याचे काम करतो. कांद्याचे सेवन केल्याने किडनीही निरोगी राहते. आपण अनेक प्रकारच्या पदार्थांमध्ये कांद्याचा वापर करू शकता.

**सफरचंद** – सफरचंदामध्ये पोटॅशिअम, फॉस्फरस, कॅल्शिअम, मॅग्नेशिअम, व्हिटॅमिन्स आणि झिंक यांसारखे पोषक घटक आढळतात. ते कोलेस्ट्रॉल नियंत्रित ठेवण्यास मदत करतात. तसेच ग्लुकोजची पातळी राखण्यासही मदत करतात. सफरचंद खाल्याने किडनी निरोगी राहते.

**फ्लॉवर** – फ्लॉवरमध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते. फ्लॉवर हे फोलेट आणि फायबरचा उत्कृष्ट स्रोत आहे. त्याच्या वापराने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत होते. त्यामुळे किडनी निरोगी राहण्यास मदत होते.

**मुळा** – मुळ्याचे सेवन करणे हे किडनीच्या आरोग्यासाठी अतिशय फायदेशीर मानले जाते. त्यामध्ये पोटॅशिअम आणि फॉस्फरस भरपूर प्रमाणात असते. तसेच त्यामध्ये व्हिटॅमिन बी आणि सी हेही असते.

## निवडक



### दिनदर्शिकेचा वितरण सोहळा

**पोलादपूर :** तालुका रहिवासी संघ, पुणे दिनदर्शिका २०२३ वितरण सोहळा पुणे येथे उद्योजिका, पोलादपूरच्या कन्या सोनलताई जाधव यांच्या हस्ते पार पडला. या प्रसंगी उद्योजिका सोनल जाधव यांनी आपले मनोगत मांडताना पोलादपूर तालुका रहिवासी संघ पुणे सामाजिक कार्यात अग्रेसर आहे. तसेच शिक्षण क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावत आहेत याबद्दल समाधान व्यक्त केले. दिनदर्शिका २०२३ सभासदांच्या हातात देताना संघटनेचे अध्यक्ष, ज्येष्ठ उद्योजक किसन भोसले यांनी २०२३ वर्षाची दिनदर्शिका स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा होत असताना दिनदर्शिकेत भारतीय स्वातंत्र्यसेनानी बद्दल माहिती देण्यात आली आहे असे नमूद केले. वितरण सोहळ्यासाठी उद्योजक सजन भोसले, संघटनेचे कार्याध्यक्ष अरविंद चव्हाण, संघटनेचे सचिव राजेंद्र मोरे, खजिनदार ज्ञानेश्वर साळुंखे व सर्व पदाधिकारी आणि सभासद उपस्थित होते.

### बोरसे यांना आयर्लंडचे निमंत्रण

**कर्जत :** येथील जगप्रसिद्ध चित्रकार पराग बोरसे यांना भारतीय दूतावास, डब्लिन, आयर्लंड यांनी कला आणि



मानवी चेतना या विषयावर व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित केले आहे. बोरसे यांना व्याख्यानासाठी आयर्लंडचे निमंत्रण म्हणजे ही बाब कर्जतकरांसाठी अभिनंदनीय आहे. भारत-आयर्लंड मैत्री व्याख्यानमालेने प्रत्येक देशातील प्रेरणादायी, सकारात्मक घडामोडींच्या परस्पर समंजसपणाला चालना देण्यासाठी विविध क्षेत्रांतील व्यापक देवाणघेवाणीसाठी व्यासपीठ तयार करून दोन्ही देशांतील लोकांमधील एकता आणि आत्मीयतेच्या पारंपारिक भावनेला पुनरुज्जीवित करण्याची आशा आहे. येथील व्याख्यानासाठी चित्रकार पराग बोरसे यांना आमंत्रित केले. ही कर्जतकरांसाठी अभिनंदनीय बाब आहे.

# अदानी कंपनीला वितरण परवाना देऊ नये

## ■ पाली सुधागडमध्ये संपाला प्रतिसाद; वीज कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य

**पाली : प्रतिनिधी**

महावीतरण कंपनीने पुकारलेल्या राज्यव्यापी संपात पाली सुधागडचे वीज कर्मचारी अभियंता मोठ्या संख्येने सहभागी झाले. परिणामी पाली विजवीतरण कार्यालय बंद आहे. अदानी इलेक्ट्रिकल कंपनीने महावितरण कंपनीच्या विभागात समांतर वीजपुरवठा करण्याची परवानगी मिळवण्यासाठी वीज नियामक आयोगाकडे अर्ज केला आहे. मागितलेल्या परवान्यासमहानिर्मिती, महापारेशण व महावितरणचा तीव्र विरोध असून अदानी कंपनीला समांतर वीज वितरणाचा परवाना देण्यात येऊ नये अशा विविध मागण्यांसाठी ३ दिवसाचा संप ३ जानेवारी रोजी रात्री १२ वाजल्यापासून पुकारला आहे.



हा संप ६ जानेवारीपर्यंत चालणार असून पाली सुधागड विजवीतरण विभागाचे सर्व कर्मचारी, अभियंता, अधिकारी यामध्ये सहभागी झाले आहेत. पाली येथील विजवीतरण कार्यालय बंद आहे. त्यामुळे नागरिकांच्या अडचणी, समस्या जैसे थे राहणार आहेत. सलग तीन दिवसांच्या पुकारलेल्या संपाला सर्वत्र प्रतिसाद मिळत आहे. रायगड जिल्ह्यातील सुधागडसह अन्य तालुक्यातील वीज कंपनी कर्मचाऱ्यांनी संप पुकारला आहे. संप असला तरी सुधागड तालुक्यातील वीज पुरवठ्यावर कोणताही परिणाम झाला नाही.

वीज अधिका-यांसह कर्मचाऱ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनामुळे त्यांच्या कोणत्याही आर्थिक मागण्या नाहीत तर नागरिकांच्या मालकीचा वीज उद्योग टिकला पाहिजे तो भांडवलदारांना विकता कामा नये, भांडवलदार नफा कमविण्याच्या उद्येशाने वीज वितरण क्षेत्रात येत आहेत, असा दावा येथील कर्मचारी यांनी केला.

वीज वितरण परवाना मिळविण्यासाठी अदानी वीज कंपनीने राज्य वीज नियामक आयोगाकडे अर्ज केला आहे. अदानी कंपनीला वीज वितरण परवाना मिळण्याबाबत राज्य सरकार सकारात्मक आहे. मात्र, महावितरण कंपनीला चांगले उत्पन्न मिळत असलेली किंवा वीजबिल वसुलीचे प्रमाण चांगले असलेले विभाग खासगी वीज कंपनीकडे जातील आणि महावितरण कंपनी आणखी आर्थिक अडचणीत सापडून शासकीय वीजकंपन्यांचे खासगीकरण होईल, तरी अदानी वीज कंपनीला वितरण परवाना देऊ नये, अशी मागणी आम्ही आमच्या आंदोलनातून करत आहोत. असे पाली सुधागड विजवीतरणचे उपअभियंता जतीन पाटील यांनी सांगितले. राज्य सरकारने वीज कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य केल्यानंतर संप मागे घेत सर्वांनी समाधान व्यक्त केले.

**संप यशस्वी**

या संपात अभियंता, वीज कर्मचारी यांचा मोठा सहभाग दिसून येतोय, तसेच जिल्ह्यासह राज्यभरात संघर्ष समिती, इंजिनीयर संघटना, वर्कर फेडरेशन, कंत्राटी कामगार महासंघ, महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ, तांत्रिक कामगार युनियन,आदींच्या सहभागाने तीन दिवशीय संप यशस्वी होईल, असा विश्वास संपकरी व्यक्त करत आहेत.

# शेतीसाठी बियाणे मिळत नसल्याने शेतकरी हतबल

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यात दरवर्षी डिसेंबर महिन्यात राजनाला कालव्याला दुबार भातशेतीसाठी पाणी सोडण्यात येते. यंदाही पाणी सोडण्यात आले आहे, मात्र भातशेती लावण्यासाठी जे चांगले बियाणे आवश्यक असते ते बियाणेच कृषी कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती, खरेदी विक्री संघ, प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र यांच्याकडे उपलब्ध नसल्याने आता भातशेती करायची तरी कशी असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे.

कर्जत तालुक्यात मोठ्या प्रमाणात भातशेती केली जाते. पावसाळ्यात पावसाच्या पाण्यावर खरीप पीक तथा भातशेती केली जाते. तेव्हा कृषी कार्यालय, कृषी उत्पन्न बाजार समिती, भात खरेदी विक्री संघाकडून शेतकऱ्यांना चांगल्या दर्जाचे बियाणे उपलब्ध करून दिले जाते. जुलै ते नोव्हेंबर या महिन्यात भात तयार होते. त्यानंतर पुन्हा याच शेतीत राजनाला कालव्याच्या पाण्यावर दुबार भातशेती करण्यात येते. मात्र त्यासाठी जे बियाणे लागते ते आता उपलब्ध होत नसल्याने शेतकऱ्यांसमोर संकट उभे राहिले आहे .

कर्जत - ३, ५, ७ ,१८४ तसेच सह्याद्री - ३ हि बियाणे चांगल्या दर्जाची असून कमी दिवसात अधिक उत्पन्न देणारी बियाणे आहेत. मात्र आता ती कोठेही उपलब्ध नाहीत. याबाबत तालुका कृषी अधिकारी शीतल शेवाळे यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी बियाणे शिल्लक नाहीत. त्यामुळे शेतकऱ्यांनी कृषी उत्पन्न बाजार समिती, भात खरेदी विक्री संघ यांच्याशी संपर्क करावा असे शेतकऱ्यांना सांगितले . शेतकऱ्यांनी त्यानुसार सुचविलेल्या ठिकाणी बियाणांबाबत विचारणा केली तेथूनही बियाणे नसल्याचे सांगण्यात आले. यामुळे शेतकरी हतबल झाले आहेत. आता त्वरित बियाणे मिळाल्यास भात लागवड केली तर एप्रिलपर्यंत भात तयार होईल अशी माहिती तानाजी चव्हाण यांनी दिली.

### ग्रामीण रस्त्यावरील दुतर्फा झाडी तोडा

**कर्जत :** ग्रामीण भागातील रस्त्यावर दोन्ही बाजूला झाडी झुडपे वाढली आहेत. या वाढलेल्या झाडीमुळे या रस्त्यावरुन ये जा करणाऱ्या वाहनचालकांना वाहने चालविताना अडथळा होत आहे. रस्त्यावरील झाडे तोडण्याची मागणी होत आहे.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed and registered contractors on MAHATRANSCO E-Tendering website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| RFx No. | Description | Est. Cost |
| --- | --- | --- |
| Tend-55/22-23 **RFx No. 7000025792** | Work for transportation, dismantling, erection of EHV Power transformer and ICT and transportation of various EHV equipments under Panvel circle. | Limited to Rs. 75 Lakh |

**EMD** 1% of Estimated Cost **Tender Fee:** Rs. 500/-+ GST **Submission of Bids:** From 04.01.2023 to 11.01.2023 up to 23:59 Hrs **Opening Date:** 12.01.2023 @ 10:00 Hrs. For further details, visit our website **https://srmetender.mahatransco.in/** **Contact Person:** The Executive Engineer, (Adm) Tel No. 022-27459624, Mob. No. 9167026141 e-mail ID: **se7200@mahatransco.in**

**Sd/-**
**Superintending Engineer**
**EHV (O&M) Circle, Panvel**

# मोठ्या बसेसना जंगल जेट्टीमध्ये स्थान दिल्यामुळे नागरिकांची कुचंबणा

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड श्रीवर्धन तालुक्यात अगदी सहज प्रवास करता यावा म्हणून जंगल जेट्टीची सुविधा महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डाकडून करून देण्यात आली आहे. या जेट्टीमध्ये मोठ्या बसेसना स्थान दिल्यामुळे नागरिकांची कुचंबणा होत आहे.

आगरदांडा ते दिघी १५ मिनिटाच्या अंतरासाठी प्रवाशी वर्गाना मोठी किंमत मोजून प्रवास करावा लागत आहे. दिघी क्वीन व सुवर्णदुर्ग मारिन सर्व्हिसेस या दोन रो-रो सेवेअंतर्गत प्रवाश्याना सुविधा पुरविली जात आहे.आगरदांडा वरून या रो-रो-सेवा दिघी पर्यंत नेल्या जातात. त्यामुळे श्रीवर्धन तालुका अगदी नजीक



आला आहे. या रो-रो सेवेमधून पर्यटक, नागरिक, शालेय मुले आदी प्रवास करीत असतात. रो-रो सेवेची क्षमता हि फक्त लहान चार चाकी गाडयांची असताना आता यामधून मोठे ट्रक व एसटी याना सुद्धा प्रवेश देण्यात आल्याने स्थानिक नागरिक व पर्यटक यांची कुचंबणा होत आहे.मोठ्या अवजड वाहनांमुळे लहान चार चाकी गाडयांना पर्याप्त जागा उपलब्ध होत नाही. त्यामुळे स्थानिक नागरिकांच्या दुचाकी गाडयांना हि मोठी वाहने डोकेदुखी ठरत आहे.

महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डाकडून रो-रो सेवेला फक्त लहान गाडयांची अनुमती असताना मोठी अवजड वाहने घेतल्याने लोकांना याचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे.येथील स्थानिक व पर्यटकांनी मोठी अवजड वाहने यांनी रस्त्यावरून प्रवास करावा अशी इच्छा व्यक्त केली आहे.मोठ्या वाजेद वाहनांमुळे चारचाकी लहान गाडयांना रो-रो-मध्ये स्थान मिळत नसल्याची तक्रार होऊ लागल्या आहेत.याबाबत महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डाने दिघी-आगरदांडा चालणाऱ्या रो-रो सेवांना अवजड वाहने न नेण्याची तंबी द्यावी अशी मागणी येथील नागरिकांकडून होत आहे.

याबाबत माजी नगरसेवक गिरीष साळी यांनी सांगितले, आगरदांडा ते दिघी जलमार्गावर महाराष्ट्र मेरी टाइम बोर्डाकडून रो-रो सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या रो-रो-सेवा यांचा आकार लहान असून यामधून मोठ्या वजनाची क्षमता असणारी अवजड वाहनांची वाहतूक करण्याची परवानगी नसताना या बोटी अवजड वाहतूक करतात याकडे बोर्डाने लक्ष देणे आवश्यक आहे. अवजड वाहनांना रस्त्याने वाहतूक करणे बंधनकारक आहे परंतु याना रो-रो सेवेत स्थान देणे हे चुकीचे आहे. अवजड वाहतूक बंद करा अन्यथा प्रवासी वर्गाला रस्त्यावर उतरून आंदोलन करावे लागेल. असा इशारा यावेळी त्यांनी दिला आहे.

**अपर जिल्हाधिकारी रायगड मुख्यालय अलिबाग यांचे न्यायालयात**
**जिल्हाधिकारी कार्यालय आवार, अलिबाग, जि. रायगड**

क्रमांक/हक्कनोंद/अपील क्र. २६३/२०२१

पार्वती ऊर्फ मोहना अर्जुन रोडपालकर
१. श्री. परशुराम अर्जुन रोडपालकर
२ श्री. हसुबाई परशुराम ढवळे
रा. शिवकर, ता. पनवेल, जि. रायगड
३ श्री. बामा अर्जुन रोडपालकर
४ श्री. माया अर्जुन रोडपालकर
अ. क्र. १, ३ व ४ रा. नेरेपाडा,
ता. पनवेल, जि. रायगड
**अपिलार्थी**

**विरुध्द**

१ धर्मा रामजी शेळके मयत तर्फे वारस
१/१ श्री. नारायण धर्मा शेळके
१/२ श्री. बळीराम धर्मा शेळके
१/३ श्री. मोतीराम धर्मा शेळके
रा. पालीखुर्द, ता. पनवेल, जि. रायगड
१/४ श्रीम. इंदुबाई नामा पाटील
रा. बेलवली, ता. पनवेल, जि. रायगड
१/५ श्रीम. सुनिता चंद्रकांत कांबळे
१/६ श्री. सुंदर नामदेव भोईर
रा. दिघाड़ी, ता. पनवेल, जि. रायगड
१/७ श्रीम. निर्मळा धर्मा शेळके
१/८ श्री. चंद्रु तुळशीराम पाटील
रा. पालीखुर्द, ता. पनवेल, जि. रायगड
२ गजानन रामजी शेळके मयत तर्फे वारस
२/१ श्री. त्रिंबक गजानन शेळके
२/२ श्रीम. छबी त्रिबंक शेळके
२/३ श्री. हेमंत त्रिंबक शेळके
रा. पालीखर्दु, ता. पनवेल, जि. रायगड
२/४ श्री. रोशन त्रिंबक शेळके, रा. बेलवली,
ता. पनवेल, जि. रायगड
३ महादेव रामजी शेळके मयत तर्फे वारस
३/ १ श्री. गणपत महादू शेळके
३/२ श्री. मधुकर महादू शेळके
३/३ श्रीम. वनिता हरीभाऊ काथारा
रा. पालीखुर्द, ता. पनवेल, जि. रायगड
३/४ श्रीम. राधा बाळकृष्ण घरतु
३/५ श्रीम. जयश्री जयवंत हातमोडे,
रा. गिरवले, ता. पनवेल, जि. रायगड
३/६ श्रीम. मंगळ अशोक घरत, रा. चिंचवण,
ता. पनवेल, जि. रायगड
४. श्री. प्रकाश राघोबा भगत
रा. उसर्ली खुर्द, ता. पनवेल, जि. रायगड
५. श्री. रमेश शिवराम खंडागळे
६. श्री. शिवराम बामा खंडागळे
रा. चिंचवण, पो. शिरढोण, ता. पनवेल, जि. रायगड
७ शिवओम डेव्हलपर्स एल एल पी तर्फे नितिन एच गणत्रा
८ डीम पाम्स को. ऑप. हौ. सोसायटी पनवेल
तर्फे मुख्य प्रवर्तक कृष्ण कुमार राम दमडे
रा. पाली खुर्द, ता. पनवेल, जि. रायगड
**उत्तरार्थी**

**महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ नुसार अपील**

या जाहीर नोटीसीद्वारे आपणास कळविण्यात येते की, मौजे पाली खुर्द, ता. पनवेल, जि. रायगड येथील सर्व्हे नं./हिस्सा नं. २९/२ क्षेत्र ०-१७-९० हे. आर पो. ख. ०-०३-० आकार ४.१९, ८/२ क्षेत्र १-२९-८० पो. ख. ०-०४-८० आकार १२.३१, १८/२ क्षेत्र ०-२५-० पो. ख. ०-०२-० आकार ५.९४, १९/४/२ क्षेत्र ०-४६-०० पो. ख. ०-०६-८० आकार १०.०६, २३/० क्षेत्र ०-६४-३० पो. ख. ०-०३-०० आकार १४.८१ या जमीन मिळकती संदर्भात अपिलार्थी यांनी या न्यायालयात दि. २०/१०/२०२१ रोजी अपील दाखल केले आहे. सदर अपीलाची नोटीस काढली असता त्याची बजावणी होऊ शकली नाही. आपला राहण्याचा शेवटचा पत्ता वरीलप्रमाणे असल्याची माहिती अपिलार्थी यांस आहे. सबब, अपिलार्थी या जाहीर समन्सद्वारे कळविण्यात येते की, सदर अपीलामध्ये दि. १८/०१/२०२३ रोजी **दुपारी ३.०० वाजता अपर जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांचे न्यायालयात सुनावणी** निश्चित करणेत आलेली आहे. तरी आपण स्वतः अगर तुमचे वकीलांमार्फत सदर सुनावणीस हजर रहावे. आपण हजर न राहील्यास आपले गैरहजेरीत अपीलाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : अलिबाग
दिनांक : ०२/०१/२०२३

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
अपर जिल्हाधिकारी रायगड
अलिबाग करीता

# पेण येथे वीज कर्मचारी एकवटले



**पेण : प्रतिनिधी**

गोरगरिबांसाठी असणारी वीज राज्य सरकारने खाजगी करण्याच्या नावावर अदानी भांडवलदारांना देण्याचा जो घाट घालत आहे त्या विरोधात आज (दि. ४) राज्यभर महाराष्ट्र राज्य विद्युत वीज कर्मचारी, अधिकारी, अभियंता यांनी ७२ तासाचा संप पुकारला.

सकाळपासूनच पेण शहरातील एमएसईबी कार्यालयाच्या बाहेर विजवितरण कंपनीचे कर्मचारी यांनी संपाला सुरुवात केली. अदानी कंपनीला समांतर वीज वितरणाचा परवाना देण्याच्या विरोधात वीज उद्योगातील ३० संघटनांचे ८६ हजार कर्मचारी, अधिकारी, अभियंते यांच्या ७२ तासाच्या पुकारलेल्या संपाला पेण महाराष्ट्र राज्य वीज कंपनी कर्मचाऱ्यांनी कार्यालयाबाहेर संप करत सर्व कर्मचाऱ्यांनी पाठींवा दर्शवत कामबंद आंदोलन केले.

# पेण तालुक्याची ईव्हीएमच्या साठवणुकीसाठी निवड

## ■ शितोळे येथे प्रांताधिकाऱ्यांच्या हस्ते बांधकामाचे भूमिपूजन

**पेण : प्रतिनिधी**

पेण हे जिल्ह्यातील मतदारसंघांना जोडणारे मध्यवर्ती ठिकाण असल्याने येथील शितोळे आदिवासीवाडीजवळील जागेची निवड ईव्हीएम, व्हीव्हीपॅट मशिन्सच्या साठवणुकीसाठी केली असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी स्नेहा उबाळे यांनी दिली. ईव्हीएम, व्हीव्हीपॅट मशिन्सच्या साठवणुकीसाठी आवश्यक असलेल्या गोदामाच्या बांधकामाचे भूमिपूजन शितोळे येथे प्रांताधिकारी विठ्ठल इनामदार यांच्या हस्ते झाले.

या वेळी बोलताना शितल उबाळे यांनी सांगितले की, ईव्हीएम, व्हीव्हीपॅट मशिन्सच्या साठवणुकीसाठी आवश्यक असलेल्या गोदामाच्या बांधकामास साधारणत: एक वर्षाचा कालावधी लागेल. शासनाकडून या कामासाठी आठ कोटी ७१ लाख २४ हजार मान्यता मिळाली आहे. या कार्यक्रमास प्रांताधिकारी पेण प्रांत विठ्ठल इमानदार, रोहा प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवळ, बांधकाम अभियंता जगदीश सुखदेवे, पेण तहसिलदार श्रीमती स्वप्नाली डोईफोडे,उरण तहसिलदार भाऊसाहेब अंधारे, पेण पोलीस निरीक्षक देवेंद्र पोळ, दादर सागरी पोलीस निरीक्षक गोविंदराव पाटील, उद्योजक राजू पिचिका आदी उपस्थित होते.



# नागोठण्यात ८ जानेवारीला अय्यप्पा महोत्सव

**नागोठणे : रामप्रहर वृत्त**

कोकणातील सर्वात मोठा अय्यप्पा महोत्सव समजला जाणाऱ्या नागोठण्यातील श्री अय्यप्पा सेवा मंडळाच्या अय्यप्पापूजा महोत्सवाचे आयोजन रविवार ८ जानेवारी रोजी करण्यात आल्याची माहिती नागोठण्यातील श्री अय्यप्पा सेवा मंडळाकडून देण्यात आली.

नागोठण्यात नोकरी, व्यवसायानिमित्त गेल्या अनेक वर्षांपासून वास्तव्यास असलेल्या केरळ राज्यांतील विविध भागांतील मल्याळी समाज बांधवांकडून नागोठण्यात दरवर्षी स्वामी अय्यप्पा पूजा महोत्सवाचे आयोजन करण्यात येत असते.

नागोठण्यातील प्रभु आळीत असलेल्या चांद्रसेनिय कायस्थ प्रभू समाजाच्या जुने रामेश्वर परिसरातील हनुमान मंदिराजवळ होणाऱ्या महोत्सवातही भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन मंडळाकडून करण्यात आले आहे.

या पूजा महोत्सवाची सुरुवात पहाटे साडेपाच वाजता श्री कूनत्तुमना शशिकुमार नंबुदरी यांच्या हस्ते महा गणपती होमाने होणार आहे. त्यानंतर सकाळी श्री अय्यप्पा स्वामींची प्रतिष्ठापना नंतर उषा पूजा, वाद्यमेळम, मध्यान्ह पूजा झाल्यानंतर दुपारी बारा वाजता वाजल्यापासून अन्न प्रसाद सुरू होणार आहे. सायंकाळी चार वाजता श्री चेलकारा माधवन कुट्टी आणि मंडळ थ्रिशुर (केरळ) यांच्याकडून थायमपाका सादर करण्यात येणार आहे. सायंकाळी सहा वाजता निरमाला विळकू, साडेसहा वाजता वाजता महा दीपाराधना, सात वाजता श्री पी.एस. उन्नीकृष्णन आणि मंडळ थ्रिशुर (केरळ) यांच्याकडून अय्यप्पन विळकू हा कार्यक्रम होणार आहे. रात्री ९.४५ वाजता तीर्थप्रसाद वाटणे व नंतर दहा वाजता हरिवरासनमने या पूजा महोत्सवाचा समारोप होणार आहे. दरम्यान पुष्पांजलीसाठी सकाळी ९.०० ते १२.३०वा. व सायंकाळी ४ ते ६ वा. दरम्यान व्यवस्था करण्यात आली आहे. त्यामुळे नागोठणे शहर व परिसरांतील नागरिकांनी या पूजा महोत्सवात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन श्री अय्यप्पा पूजा महोत्सव समिती कडून करण्यात आले आहे.

# खारघर भाजपतर्फे अजित पवारांचा निषेध

**खारघर : रामप्रहर वृत्त**

नागपूर विधिमंडळ अधिवेशनात भर सभागृहात विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी छत्रपती संभाजी महाराजांबद्दल केलेल्या बेताल वक्तव्याचा खारघर भाजपाच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आला.

भारतीय जनता पक्ष खारघर मंडलाचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज हे आपल्या सर्वांचे आराध्य दैवत आहेत. त्यांच्याबाबत अनुद्गार काढणे हे चुकीचे असून या वक्तव्याचा आम्ही निषेध करतो, लवकरात लवकर त्यांनी देशाची व जनतेची माफी मागावी अन्यथा यापुढे उग्र निषेध केला जाईल असा इशारा दिला.

छत्रपती संभाजी महाराजांचा तेजस्वी इतिहास वारंवार पुसण्याचे आणि बदलण्याचे काम होत असून आम्ही तसे करणाऱ्यांचा निषेध नोंदवतो अशी संतप्त प्रतिक्रिया पनवेल महापालिकेचे माजी नगरसेवक शत्रुघ्न काकडे यांनी केली.






छत्रपती संभाजी महाराज हे धर्मवीर नसून ते स्वराज्यरक्षक होते हे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी काढलेले उद्गार अवमानकारक असल्याचा आरोप करत खारघर भाजपने खारघर रेल्वे स्टेशनजवळ निषेध आंदोलन केले.

या वेळी अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांच्या सोबत माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, प्रवीण पाटील, शत्रुघ्न काकडे, रामजी बेरा, ॲड. नरेश ठाकूर, निलेश बाविस्कर, गुरुनाथ गायकर, सरचिटणीस दीपक शिंदे, किर्ती नवघरे, उपाध्यक्ष दिलीप जाधव, उपाध्यक्ष रमेश खड़कर, युवा मोर्चा सरचिटणीस अमर उपाध्याय, सोशल मीडिया सहसंयोजिका मोना आडवाणी, महिला सरचिटणीस साधना पवार, कांचन बिरला, शोभा मिश्रा, सुशीला शर्मा, निर्मला यादव, जलपा शास्त्री, प्रसिद्धी प्रमुख प्रभाकर बांगर, प्रभाग ५ अध्यक्ष वासुदेव पाटील, प्रभाग-३ अध्यक्ष मुनाफ पटेल, अनिता ज ाधव, विनोद ठाकूर, भरत कोंढाळकर, काशिनाथ घरत, संतोष शर्मा, ज्येष्ठ नागरिक सेलचे संयोजक नवनीत मारू, संजय शर्मा, आनंदा मोकाशी, उत्तर भारतीय सेल सह संयोजक शैलेन्द्र त्रिपाठी, अध्यात्मिक सेलचे संयोजक नवलकुमार मोरे, योगिन्द्रम कोट्टरी, पवित्रा कोट्टरी, व्यापारी सेलचे सहसंयोजक अशोक जांगिड़, दिलीप आड़े, प्रवीण बेरा आदी पदाधिकारी व नागरिक उपस्थित राहून जोरदार घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला.

# जेएनपीए बंदराची गतवर्षी विक्रमी माल हाताळणी

**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण अर्थात जेएनपीए हे भारतातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणारे बंदर असून जेएनपीए ने वर्ष २०२२ मध्ये विक्रमी माल हाताळणी केली आहे. जेएनपीए मध्ये वर्ष २०२२ मध्ये एकूण ५,९५९,११२ टीईयू कंटेनरची वाहतूक करण्यात आली आहे जी वर्ष २०२१ च्या ५,६३१,९४९ टीईयू च्या तुलनेत ५.८१ टक्के अधिक आहे.

याचबरोबर जेएनपीएने २०२२मध्ये एकूण ८१.१ दशलक्ष मेट्रिक टन वाहतूक केली आहे जी २०२१ च्या ७६.१ दशलक्ष मेट्रिक टनाच्या तुलनेत ६.५५ टक्के अधिक आहे. जेएनपीए बंदरात वर्ष २०२२ मध्ये झालेली एकूण ८१.१ दशलक्ष मेट्रिक टन वाहतूक व ५,९५९,११२ टीईयूची कंटेनर वाहतूक ही बंदराच्या स्थापनेपासून आजवर एका वर्षात हाताळलेली सर्वाधिक वाहतूक आहे.

जेएनपीएच्या या विक्रमी कामगिरीसाठी बंदरातील कर्मचारी आणि भागधारकांचे त्यांच्या समर्पित परिश्रमाबद्दल कौतुक करताना जेएनपीएचे अध्यक्ष संजय सेठी म्हणाले, २०२२ हे वर्ष जेएनपीए साठी अभूतपूर्व ठरले कारण आम्ही या वर्षात विक्रमी माल हाताळणी करून बंदरातील आजवरची सर्वाधिक वाहतूक करण्याचा कीर्तिमान स्थापन केला आहे. बंदरातील सर्व टर्मिनल ऑपरेटर्सची कामगिरी विशेष कौतुकास्पद झाली आहे. याशिवाय, २०२२ मध्ये, आम्ही भारतातील सर्वोत्तम कामगिरी करणारे बंदर असा बहुमान प्राप्त केला आहे. यासोबतच जेएनपीए

हे भारतातील पहिले १०० टक्के लैंडलॉर्ड मेजर पोर्ट बनले असून उत्कृष्ट कामगिरीसाठी



जेएनपीएला विविध प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. याप्रसंगी मी आमचे कामगार व भागधारक यांचे विशेष आभार मानू इच्छितो कारण बंदराच्या कामगिरी मध्ये निरंतर वाढ करण्यामध्ये आणि जेएनपीएच्या यशोगाथेमध्ये त्यांचे महत्वपूर्ण योगदान आहे.

बंदराच्या उत्कृष्ट कामगिरीची व प्रयत्नांची दखल घेत जेएनपीएला सागरी आणि लॉजिस्टिक पुरस्कार २०२२ मध्ये कंटेनर बंदरांच्या श्रेणीतील २०२२ चा 'वर्षातील सर्वोत्कृष्ट मेजर पोर्ट'चा पुरस्कार आणि इकॉनॉमिक टाइम्स इन्फ्रा फोकस अवॉर्ड्स २०२२' चा मोस्ट ॲडमायर्ड सेंट्रल एंटिटी प्रमोटिंग पीपीपी (पोर्ट्स) पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले आहे.

## उरण महाविद्यालयात पोलीस दल स्थापना दिन

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने पोलीस विभाग स्थापना दिवस साजरा करण्यात आला.

प्रमुख पाहुणे सहाय्यक पोलीस निरिक्षक अनिरूध्द ज्ञानोबा गिजे यांनी ऑनलाईन फ्रॉड, डिजीटल फसवणूक, इतर सायबर गुन्हे, मोटर व्हईकल ॲक्ट व नियम, पोलीस विभागाची कार्यपध्दती, मुलींच्या समस्या सोडविण्यासाठी तत्पर महिला अधिकारी इत्यादी विषयी सविस्तर मागदर्शन केले. या वेळी महिला पोलीस हवालदार रचना ठाकूर, पोलीस हवालदार



युवराज जाधव उपस्थित होते.महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. बळीराम एन. गायकवाड यांच्या मागदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात आय. क्यु.ए.सी. समन्वयक प्रा. डॉ. ए. आर. चव्हाण यांनी आभार मानले. ालयातील शिक्षक व मोठ्या संख्येने विदयार्थी उपस्थित होते.

# पनवेलमध्ये भगवान वाल्मिकी भवन उभारण्याची मागणी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलचे स्वच्छता दूत अशी ओळख असणाऱ्या वाल्मिकी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी पनवेलमध्ये भगवान वाल्मिकी भवन उभारण्यात यावे, अशी मागणी बाळासाहेबांची शिवसेनेचे पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनावणे यांनी पनवेल महापालिकेकडे निवेदनाद्वारे केली आहे. पनवेल परिसरामध्ये शेकडो वर्षांपासून वाल्मिकी समाज वास्तव्यास आहे. पनवेल परिसरात या समाज बांधवासाठी एकही हक्काची अशी वास्तू नाही. परिणामी या समाजातील सर्व शुभकार्ये व इतर समारंभ रस्त्यावर आयोजित करावी लागतात. यासमाजासाठी पनवेलमध्ये भगवान वाल्मिकी भवन उभारण्यात यावे, अशी मागणी बाळासाहेबांची शिवसेनेचे पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनावणे यांनी पनवेल महापालिकेकडे निवेदनाद्वारे केली आहे.

याचप्रमाणे पनवेल महानगरप्रमुख प्रथमेश चंद्रशेखर सोमण व पनवेल शहर प्रमुख प्रसाद सोनावणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे या भवनासाठी एक कोटीच्या निधीची मागणीदेखील केली आहे.

### वाल्मिकी नगरातील ड्रेनेज लाईन दुरुस्त करावी

***पनवेल शहरातील वाल्मिकी नगर वसाहत येथील ड्रेनेज लाईनची अवस्था हि खूप गंभीर झालेली आहे. पंतप्रधान आवास योजने अंतर्गत वाल्मिकी नगर वसाहतीचे पुनर्वसन होणार आहे, परंतु असे असले तरीही सद्यस्थितीत वसाहतीतील सर्व नागरिकांना रोज दुर्गंधीचा सामना करावा लागतोय. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी वसाहतीमध्ये स्वच्छता करून दिली. परंतु हा विषय तात्पुरत्या साफसफाईने सुटणार नसून सदर ड्रेनेज लाईन दुरुस्त करण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे हि ड्रेनेज लाईन तातडीने दुरुस्ती द्यावी, असे सोनावणे यांनी निवेदनात म्हटले आहे.***

# वीर वाजेकर महाविद्यालयात व्याख्यान

### पोलीस स्थापना दिनाचे औचित्य

**उरण : वार्ताहर**

राष्ट्रीय सेवा योजना विभाग आयोजित अमली पदार्थ सेवन बंद काळाची गरज या विषयावर पोलीस स्थापना दिनाचे औचित्य साधून मंगळवारी (दि. ३) नवी मुंबई पोलीस व न्हाव्हा-शेवा पोलीस स्टेशन यांच्या माध्यमातून व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.

नवी मुंबई गुन्हे शाखा वरीष्ठ पोलीस निरीक्षक अतुल आहेर यांनी अमानवीय तस्करी या विषयावर सविस्तर माहिती मुलांना दिली. सायबर गुन्हेगारी म्हणजे नेमकी काय,व सायबर



गुन्हे कसे घडतात याविषयावर के. के. नाईक (न्हावा शेवा, पोलीस स्टेशन) यांनी महत्त्वपूर्ण माहीती दिली. डॉ. अब्रार यांनी आजचा तरुण अमली पदार्थ सेवनांच्या जाळ्यात कसा अडकत चालला आहे, यावर सविस्तर चर्चा केली. चाईल्ड हेल्प लाईनचे महेंद्र जाधव यांनी अमली पदार्थ सेवनामुळे लहान मुले कशी बळी पडतात आणि अशा असंख्य मुलांना सांभाळण्याचे काम आमची संस्था करते.

श्री. अहिरे यांनी तरुण वयातील मुले व मुली आज मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ सेवन करतांना दिसतात. त्यांना वेळीच आकळले पाहिजे. या कार्यक्रमास श्री. लेंडी, श्री. गावित आदी पोलीस कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. श्रीकांत गोतपागर यांनी केले. डॉ. विलास महाले, उपप्राचार्य यांनी अध्यक्षशिय मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास प्रा. गजानन चव्हाण, प्रा. योगेश कुलकर्णी, डॉ. संदीप घोडके, डॉ. गुर्मीत वादवा, डॉ. आमोद ठक्कर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सी. डी. थिंदळे यांनी केले, तर आभार प्रा. राम गोसावी यांनी मानले. कार्यक्रमाची पूर्व तयारी मयूर पाटील, आरती सुरवसे, दीपेन तांडेल, विशाल खरात, युवराज चव्हाण, मंदीरा म्हात्रे यांनी केली, राष्ट्रीय सेवा योजनेचे सर्व स्वयंसेवक उपस्थित होते.

# 'विद्याभवन'च्या ३१ विद्यार्थ्यांची राज्य शिष्यवृत्तीसाठी निवड

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने घेतलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेतून पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलातील ३१ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे.

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात घेतलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेची गुणवत्ता यादी अगोदरच जाहीर केली होती. नुकतेच शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांची नावे ऑनलाइन जाहीर करण्यात आले. श्रवण ज्ञानेश्वर गंधात्के, ओमकार अनिल तेटमे, मानस केतन म्हात्रे, अर्चित राजेंद्र निंबाळकर, सोहम उमेश घाडगे, साक्षी दादासो ढाले, तनिषा लालासाहेब इंदलकर, साहिल संतोष शिंदे, भार्गवी दिनेश वाघचौरे, हर्षिता विनायक वारगे, प्रणिती रुपेश कळंत्रे, मानवी किसन गुळवे, श्रावणी सुधीर भोसले, वेदांत दत्तात्रय कंक, धिरज हरिभाऊ वणवे, श्रावणी दिनेश साळुंखे, चैतन्य सुरेन्द्र पाटील, कुणाल ज्ञानेश्वर गंधात्के, सार्थक राजेश जाधव, साजरी



गणेश राजिवडे, दिशा रोहिदास नाईकरे, प्रिन्स उमाशंकर वैश्य, ईशान सचिन चव्हाण, अरेंज फिरोज पटवेगार, अथर्व सुरेश गांजाळे, श्रवण दिनेश साळुंखे, तन्वी अनिलकुमार पुजारी, गार्गी रुपेश कांबळे, भूमी सचिन गायकवाड, आर्या पंढरीनाथ रोकडे, नमन वीरेंद्र सिंग या विद्यार्थ्यांची प्राथमिक आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे.

पुणे विद्यार्थी गृहाचे कार्याध्यक्ष सुनिल रेडेकर, उपकार्याध्यक्ष सुभाष जिर्गे, कार्यवाह प्रा.राजेंद्र कांबळे, कोषाध्यक्ष आनंद कुलकर्णी , कुलसचिव अमोल जोशी, माजी कार्याध्यक्ष प्रा.कृ.ना. शिरकांडे, संचालक राजेंद्र बोर्हाडे, दिनेश मिसाळ, मुख्याध्यापक राजेंद्र ढेरगे, राजकुमारी इंदलकर, सुवर्णा मिसाळ, श्रीजा नायर, मनीषा मुळीक, समन्वयक पांडुरंग मुळीक तसेच सर्व शिक्षक आणि पालकांनी शिष्यवृत्तीसाठी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे अभिनंदन केले.

# नवी मुंबईतील शाळा-महाविद्यालयांमध्ये सावित्रीबाई जयंती उत्साहात




सत्याग्रह महाविद्यालय

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

खारघर येथील सत्याग्रह महाविद्यालयात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची १९२ वी जयंती प्राचार्या वनिता सुर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली प्रा. संगीता जोगदंड यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. प्रारंभीक्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस प्राध्यापिका डॉ. निधी अग्रवाल यांनी पुष्पहार अर्पण केला. प्रा. संगीता जोगदंड यांच्यासह ललिता यशवंते, प्रा. यलोरा मित्रा, प्रा ललिता यशवंते यांनीही आपले मौलिक विचार या वेळी मांडले.

कार्यक्रमाला विद्यार्थी, शिक्षक मोठया संख्येने उपस्थित होते.

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका संचलित राजर्षी छत्रपती शाहू महाराज विद्यालय आंबेडकर नगर रबाळे येथे ३ जानेवारी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीच्या निमित्ताने क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात झाला.

पालिकेच्या अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले या उपस्थित होत्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी महापौर सुधाकर सोनवणे हे उपस्थित होते. कार्यक्रमास माजी नगरसेविका रंजना सोनवणे, शिक्षणाधिकारी अरुणा यादव, विस्तार अधिकारी कल्पना गोसावी, मुख्याध्यापक अमोल खरसंबळे, रंजना वंनशा, जेपी सिंग आदी उपस्थित होते.

वैशाली धनावडे, क्रीडाशिक्षक अमोलकुमार वाघमारे, कमलेश इंगळे, अमोल वाघमारे, हेमंत भोईर, नेहा मनुचारी, अर्चना म्हात्रे, विजय चौरे, विनोद झापडे, ब्रिजलाल ठाकरे, लीना पाटील, माधुरी शिंनकर, आदिनाथ पालवे, राहुल शुक्ला आदी उपस्थित होते.



शाहू विद्यालय

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या वाशी येथील कर्मवीर भाऊराव पाटील (केबीपी) कॉलेजमध्ये सावित्रीबाई फुले यांची १९२ वी जयंती साजरी करण्यात आली. या जयंतीनिमित्त एका व्याख्यानपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला मुंबई आकाशवाणी केंद्राच्या माजी केंद्रनिदेशक कांचन संगीत प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. शुभदा नायक होत्या.

या वेळी कांचन संगीत यांनी सावित्रीबाई फुले यांचा संघर्षमय जीवनप्रवास विविध प्रसंगाच्या आधारे उपस्थितांना उलगडून सांगितला. तसेच आजच्या नव्या पिढीने सावित्रीबाईंचे क्रांतिकारक कार्य समजून घेतले पाहिजे आणि नव्या बदलासाठी तरुणाईने सज्ज झाले पाहिजे.



केबीपी कॉलेज

सावित्रीबाईचे जीवन आणि कार्य सर्वासाठी प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. तर प्राचार्या डॉ. शुभदा नायक यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सावित्रीबाईच्या सामाजिक कार्याची जाणीव ठेवून, नव्या पिढीने समाजाच्या गरजा आणि आव्हाने ओळखून काम केले पाहिजे. तसेच आजच्या शिक्षकांनीही शिक्षण क्षेत्रातीत आव्हाने समजून घेऊन, शिक्षण क्षेत्रातील चांगल्या बदलासाठी काम केले पाहिजे, असे मत व्यक्त केले.

या वेळी सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त घेतलेल्या विविध स्पर्धाचे बक्षीस वितरण मान्यवरांच्या हस्ते झाले. कार्यक्रमाची सुरूवात सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारीत असलेल्या ओवी गायनाने करण्यात आली. प्रास्ताविक महिला सक्षमीकरण समितीच्या चेअरमन मानसी रसाळ यांनी केले.

सूत्रसंचालन व आभार प्रा. गायत्री भागवत यांनी केले. कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ. राजश्री घोरपडे तसेच शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिला सक्षमीकरण समितीच्या सदस्याने सहकार्य केले.


# घरे उभारणारेच होताहेत बेघर

## नाका कामगारांचे जीवन असुरक्षित; मुलांच्या नशिबीही बिगारीचे काम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा हा औद्योगिक परिसराने वेढलेला भाग असल्याने या परिसरात नव्याने उभी राहणारी गृहसंकुले, औद्योगिक वसाहत, महाविद्यालये, शासकीय कार्यालये आदी कामांकरीता ठेकेदारांकडे बिगारी कामे निघत आहेत. या कामांकरीता मोहोपाडा रसायनी परीसरात नाका कामगार मोठ्या प्रमाणात मिळत आहेत. त्यांना रोजंदारीचे चांगले आमिषही दाखविले जात आहे मात्र त्यांच्या हक्काचे पैसे देण्याची वेळ येते. त्यावेळी त्यांना भांडल्याशिवाय ते पैसे मिळत नसल्याचे वास्तव आहे.

कष्टाच्या, बिगारी कामासाठी कर्नाटक, आंध्र प्रदेश आदी भागातील माणसे काम मिळेल या अपेक्षेने सकाळी साडेसात वाजल्यापासून परिसरातील मोहोपाडा मिनीडोअर असल्याने मोहोपाडा व वावेघर नाका थांब्याजवळ तसेच वावेघर नाक्यावर उभे असतात. या नाका कामगारांना दिवसाकाठी ६०० रुपये हजेरी मिळते. बिगारी ५०० ते ६०० व महिला बिगारीला ४०० ते ४५० अशी मजुरी मिळत असल्याने मोहोपाडा व वावेघर नाका सकाळी नाका कामगारांच्या गर्दीने फुलून गेलेला असतो. येथील नाका कामगारांच्या हाताला काम मिळत असले तरी दाम मात्र भांडून घ्यावे लागत आहे. यामुळे कामगारांना



हक्कासाठी झगडावे लागत आहे.

वेठबिगारी नाका कामगारांच्या पाचवीला पुजली आहे. बांधकाम क्षेत्रात राहून लोकांची घरे उभारणारे हात बेघर असल्याने जमिनीवर झोपड्या उभारुन काही कुटुंबे जीवन जगताना दिसतात. काही ठेकेदार बिगारीचे काम करणाऱ्या कामगारांना वेठबिगारीप्रमाणे राबवून घेत असल्याचे कामगार प्रतिनिधी बद्रीनाथ चव्हाण यांनी सांगितले.

### जीव धोक्यात!

बिगारीचे काम करताना बहुमजली इमारतींच्या कामावर जीव, धोक्यात घालून लक्ष द्यावे लागते. या नाका कामगारांचे जीवन असुरक्षित असून या कामगारांना शासनाच्या किमान वेतन व इतर सुविधा मिळणे गरजेचे आहे. कामाची हमी नसल्याने मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न देखील भेडसावत असल्याने मुलांच्या नशिबीसुध्दा बिगारी काम असल्याची स्थिती निर्माण झाल्याचे नाका कामगारांचे म्हणणे आहे.

# आईची सावली हरपल्याने मुलाने कार्यावेळी वाटली डेरेदार आम्रवृक्षांची कलमी रोपे





**पोलादपूर : प्रतिनिधी**

शहरातील दुचाकी आणि तीनचाकी वाहनांची दुरूस्ती करून उपजिविका साधणाऱ्या मुलाने त्याच्या आईच्या कृपाछत्राखाली मिळणारी सावली हरपल्यानंतर तेरावे उत्तरकार्यप्रसंगी उपस्थित समाजबांधव आप्तपरिवार आणि शोकाकूल जनांना डेरेदार आम्रवृक्ष होईल अशा स्वरूपाची आंब्यांची कलमी रोपांचे वाटप केले. यामुळे समाजासमोर आदर्श निर्माण करण्यासाठी इच्छाशक्तीची देखील गरज असल्याचे अधोरेखित झाले आहे.

पोलादपूर शहरामध्ये संदीप किसन शिर्के हा मोटारमॅकेनिक तरूण त्याची आई, पत्नी व मुला-बाळांसोबत राहून मेहनतीने उपजिविका करीत असताना त्यांच्या कुटूंबियांवर आई शालन किसन शिर्के या ६५ वर्षीय माऊलीची मायेची सावली कायम होती.

अचानक आईचे निधन झाल्यानंतर आईची मायेची सावली हरपलेला मुलगा संदीप आणि त्याची पत्नी शोभा संदीप शिर्के या उभयतांनी आईच्या सावलीची आठवण चिरंतन ठेवण्यासाठी तेराव्याच्या कार्यासाठी आलेल्या शोकाकूल आप्तपरिवारासह ग्रामस्थांना भोजनापूर्वी प्रत्येकी एक आम्रवृक्षाचे कलमी रोप भेट देत आईची आठवण सर्वांच्या मनात आणि अंगणात कायम राहण्यासाठी मनोकामना केली.

गरीबी आणि कष्टातून प्रामाणिकपणे सर्वपरिचित झालेल्या संदीप शिर्के या तरूणाने मातृवियोगाच्या दुःखातही समाजोपयोगी उपक्रम राबवून वेगळाच आदर्श निर्माण केला आहे.

# रोहा येथे आनंद मेळा उत्साहात

**रोहे : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ रोहा सेंट्रलच्या वतीने आनंद मेळावा जल्लोशात साजरा करण्यात आला. दोन वर्षे कोरोना काळात हा कार्यक्रम झाला नाही परंतु यावर्षी आयोजकांचे नेटक्या नियोजनामुळे भव्यदिव्य असा आनंद मेळावा उत्साहात साजरा करून नववर्षाचे केक कापून व फटाक्यांच्या आतिषबाजीने स्वागत करण्यात आले.

सुरूवातीला सायंकाळी ७.०० वाजता मान्यवरांच्या हस्ते कार्यक्रमाचे फित कापून उद्घाटन करण्यात आले. उपस्थित रोटरी क्लब ऑफ पनवेलचे अविनाश कोळी, अलका कोळी, रोहा पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक प्रमोद बाबर, प्रेसिडेंट सुचित पाटील, सचिव देवेंद्र चांदगांवकर, खजिनदार विजय दिवकर, प्रोजेक्ट चेअरदिपक सिंह, प्रोजेक्ट चेअरअजित तेलंगे, गणेश सरदार, मयुर दिवेकर, कल्चर चेअरराम नाकती, गितराज म्हस्के, डॉ.प्रथमेश बुधे, रतीष मगर, संदेश कापसे, लक्ष्मण मोरे, मनोज बोराणा, परेश जैन, राहुल जैन, अविन शर्मा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली .

कार्यक्रमात विविध प्रकारचे गेम्स, मिमिक्री,खेळ, पैठणीचा खेळ.. स्मार्ट गर्ल, स्मार्ट बॉय, स्मार्ट कपल इ. कार्यक्रमाची रेलचेल होती. विविध प्रकारच्या खाद्य पदार्थाचे येथे स्टॉल लावण्यात आले होते. लकी ड्रॉ साठी विविध आकर्षक बक्षिसे लावण्यात आली होती. प्रथम क्रमांकासाठी बाईक, एलईडी टीव्ही, मोबाईल, सायकल, गोल्ड कॉइन इ. बक्षिसे देण्यात आली.




# सावित्रीमाईंच्या योगदानाने महिलांचे स्थान उंचावले : डॉ. सायली मानकर

**पाली : प्रतिनिधी**

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांचा निस्सीम त्याग व योगदानाने महिलांचे स्थान उंचावले असल्याचे प्रतिपादन पाली प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. सायली मानकर यांनी केले. सावित्रीमाई फुले यांच्या पुण्याईने महिला सक्षम व आत्मनिर्भर बनल्या असल्याचे डॉ. मानकर म्हणाल्या.

पाली प्राथमिक आरोग्य केंद्राच्यावतीने क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी सावित्रीमाई फुले यांच्या योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. यावेळी स्वप्नजा देशमुख म्हणाल्या की, आधुनिक भारतात खऱ्या अर्थाने शिक्षण क्षेत्रात क्रांती केली असेल तर ती फुले दाम्पत्याने.

१ जानेवारी १८४८ रोजी पुण्यात मुलींसाठी पहिली शाळा राष्ट्रपिता ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी सुरू केली. राष्ट्रपिता ज्योतिराव फुले यांनी सावित्रीबाई फुले यांना शिक्षित केले व त्या पहिल्या शिक्षिका तथा मुख्याध्यापिका झाल्या. सर्व बहुजन समाजाला शिक्षण देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य हे राष्ट्रपिता ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांनी केले आहे. आज सर्व स्त्रिया व बहुजन समाज शिक्षणात उच्च शिखर गाठत आहे त्याचे सर्व श्रेय क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले व राष्ट्रपिता ज्योतिराव फुले यांना जाते, असे देशमुख म्हणाल्या.

या वेळी वैद्यकीय अधिकारी डॉ. सायली मानकर, आरोग्य सहाय्यिका स्वप्नजा देशमुख , औषध निर्माता सुरेश पाटिल, आरोग्य सहाय्यक कमलाकर मोकल, व आरोग्य केंद्राचे कर्मचारी उपस्थित होते.



# वारकरी संप्रदाय जात-पात मानत नाही -चिन्मय महाराज सातारकर

**कर्जत : प्रतिनिधी**

कुणी कुठे जन्माला आला ते बघण्यापेक्षा तो काय कर्म करतो ते महत्त्वाचे आहे. जात-पात आपणच तयार केल्या आहेत. वारकरी संप्रदाय असा एकमेव संप्रदाय आहे त्यामध्ये संतांनी केलेल्या काल्यामुळे सर्व समाजाला एकत्र केले आणि काल्याचा प्रसाद एकमेकांच्या तोंडात कोणताही भेदभाव न करता भरविला जातो, असे प्रतिपादन हभप चिन्मय महाराज सातारकर-दांडेकर यांनी येथे केले.

कर्जतमधील पोलीस ठाण्याच्या माऊली मैदानावर अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन कारण्यात आले होते.

सात दिवस ज्ञानेश्वरी ग्रंथ पारायण, प्रवचने, कीर्तने आदी धार्मिक कार्यक्रमांनी संपूर्ण परिसर भक्तीरसात डुंबला होता. दीपोत्सवापूर्वी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर ह. भ. प. मारुती महाराज राणे यांच्या मार्गदर्शनाखाली



दीपोत्सवाचा सोहळा उत्साहात झाला.

या वेळी नगराध्यक्ष सुवर्णा जोशी, माजी नगराध्यक्ष राजेश लाड, नगरसेवक बळवंत घुमरे, दत्तात्रेय म्हसे, हरिभाऊ वाघमारे, संभाजी देशमुख, दीपक लाड, सुदाम कार्ले, अमोल देशमुख, नगरसेविका सुवर्णा निलधे, संचिता पाटील, स्वामिनी मांजरे, डेरवणकर, सुचिता वांजळे, वनिता म्हसे, माजी सरपंच भाई गायकर, हभप नथुराम हरपुडे, श्रीराम पुरोहित, शिवाजी भासे, संतोष वैद्य, साजन ओसवाल, मिलिंद तिवाटणे आदी उपस्थित होते.

समारोपाच्या दिवशी काल्याच्या कीर्तनात हभप चिन्मय महाराज दांडेकर यांनी, 'कंठी धरिला कृष्ण मणी। अवघा जनी प्रकाश।।' या अभंगावर किर्तनामधून मार्गदर्शन करताना अनेक अनुभव व दृष्टांत दिले. त्यांनतर भासे या चिमुरड्या कृष्णरूपी बालकाने दहीहंडी फोडून काला केला. सर्वांनी त्याचा लाभ घेतला.

# आदिवासी आश्रमशाळेत सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**पाली : प्रतिनिधी**

स्त्री शिक्षणाच्या जननी माता सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्सव सोहळा सुधागड तालुक्यातील पडसरे येथील आदिवासी आश्रम शाळेत वेगवेगळ्या उपक्रमाअंतर्गत साजरा करण्यात आला. या वेळी प्रथम क्रांतीज्योती सावित्री मातेच्या प्रतिमेचे पूजन व महापुरुषांच्या प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या.



कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांनी नृत्याच्या माध्यमातून स्वागत गीतातून केली. कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या सुनीता बिनेदार यांनी विद्यार्थ्यांनी जीवनात यशस्वी होण्यासाठी टाईम मॅनेजमेंट कसे पाळायला हवे व अभ्यास करण्याची सोपी पद्धत विषयी मार्गदर्शन केले. सावित्रीमाईंचे जीवनकार्य समस्त महिलांना आदर्श व प्रेरणा देणारे आहे. शेण, दगड गोटे खाऊन त्या महिलांच्या हक्क अधिकारासाठी झटल्या. महिलांसाठी काढलेली पहिली शाळा हे त्यांच्या जीवनातील क्रांतिकारी पर्व मानले जाते. महिलांमध्ये क्रांतीची ज्योत चेतवून क्रांतिसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या मार्गदर्शनाने पुरुषप्रधान संस्कृतीला आव्हान देत महिलांना चूल आणि मूल यातून बाहेर काढून शिक्षणाची कवाडे खुली करून दिली. सावित्रीमाईंचा विचार कृतीतून पुढे नेणें हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल असे सुनीता बिनेदार यांनी सांगितले.

महिला परिवाराच्या अध्यक्षा राजेश्री दाभाडे यांनी अध्यक्षीय भाषण केले व आभार संध्या गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन अक्षदा बिनेदार व तालुका खजिनदार संध्या जाधव यांनी केले.

या वेळी रवींद्र लिमये, कोंकण रिपब्लिकन नेते व्हि.के.जाधव, पत्रकार धम्मशील सावंत, कविवर्य प्रभाकर ओव्हाळ , ह. भ. प. महेश पोंगडे महाराज, संस्थेचे सचिव नरेश गायकवाड, उपाध्यक्ष सुरेश गायकवाड, खजिनदार दिपक दाभाडे, विश्वस्त कमलेश शिंदे, संघटक सचिव प्रशिक बिनेदार, कार्यालयीन सचिव रवींद्र गायकवाड, ममता भगत उपस्थित होत्या. रोहा तालुका उपाध्यक्ष मंजुळा जाधव, संघटक सुनीता दाभाडे, वैशाली जाधव, पोर्णिमा दाभाडे, नीलम गायकवाड, सुप्रिया गायकवाड, हर्षदा खंडारे, श्वेता कांबळे उपस्थित होत्या.

## सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**कर्जत :** तालुक्यातील खांडपे येथील कर्जत केंद्र शाळेत सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

खांडपे येथील केंद्रामधील खरवंडी येथील पेंडागॉन फॉर्म हाऊस येथे खांडपे केंद्रातील १३ शाळांतील शिक्षक आणि विद्यार्थीनीनी यांनी सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी राजेंद्र आढाव, पुष्पा भुजंग दौंड यांच्या उपस्थितीत कुस्ती स्पर्धेत विभागस्तरावर प्रथम क्रमांक पटकाणाऱ्या वैष्णवी गंगावणे या खेळाडूचा सत्कार केला. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावरील नाटिका शिक्षिकांनी सादर केली.

## निवडक



### धाटाव येथे निवासी शिबिराला प्रतिसाद

**रोहा :** धाटाव येथील एम. बी. मोरे महिला महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना निवासी शिबिर येथे घेण्यात आले. राष्ट्रीय सेवा योजना विशेष सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिरामधे गाव परिसर स्वच्छता, वृक्षारोपण, अंधश्रद्धा निर्मूलन, मनोरंजन कार्यक्रम, बौद्धिक प्रबोधन, व्याख्यान, पथनाट्य, पर्यावरण संवर्धन, सांस्कृतिक कार्यक्रम इत्यादी रचनात्मक कार्यात सर्व शिबिरार्थींनी योगदान देऊन शिबिर यशस्वी केले. विद्यार्थीनींनी श्रमदानातून गावातील कानाकोपऱ्याची स्वच्छता करून प्लास्टिक व इतर कचरा एकत्रित करून त्याचे योग्य प्रकारे विल्हेवाट लावले. कार्यक्रमाचे उद्घाटन सरपंच नितीन वारंगे, संस्थेचे संचालक अशोकराव मोरे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी वेदिका डाके, विलास डाके, वैभवी भगत, अक्षरा वारंगे, प्राचार्य प्रसन्न म्हसळकर, प्रा. नंदिनी जोशी, प्रा.प्रतिमा भोईर, शिपाई किशोरी रटाटे व ५० विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

### सावित्रीबाई फुले जयंती साजरी



**माथेरान :** प्राचार्य शांताराम यशवंत गव्हाणकर विद्यामंदिर माथेरान या शाळेत ३ जानेवारी रोजी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रत्येक वर्गाच्या विद्यार्थ्यानी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर आधारित छोट्या छोट्या नाटूकल्या तयार करून सादर केल्या. काही विद्यार्थिनी सावित्रीबाईंच्या पोशाखात आलेल्या होत्या. सावित्रीबाईंच्या जीवनातील महत्वाच्या घटना नाट्य रुपात दाखविल्यामुळे मुलांच्या ज्ञानात भर पडली. या प्रसंगी शिक्षक संघपाल वाठोरे यांनी सावित्रीबाई यांच्या जीवनातील विविध पैलू विद्यार्थ्यांना उलगडून सांगितले. सावित्रीबाई तत्कालीन समाजात सुद्धा पुरोगामी होत्या याची उदाहरणे दिली. शिक्षिका विदुला गोसावी यांनी सावित्रीबाईंच्या लुगड्याची गोष्ट मुलांना सांगितली तर शिक्षक रमेश ढोले यांनी आपण महापुरुषांच्या विचारांचा आदर्श घेणे गरजेचे आहे असे नमूद केले.

### अलिबाग येथे कादंबरीचे प्रकाशन



**अलिबाग :** अॅड. विलास नाईक यांचे अनुभवसिध्द लेखणीतून साकार झालेली आठवी साहित्यकृती बेनिफिट ऑफ डाउट ही खून खटल्यावर आधारीत कादंबरीचे प्रकाशन अलिबाग येथे रविवारी (दि.१ ) ज्येष्ठ गझलकार आप्पा ठाकूर व अलिबाग-मुरुड विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेंद्र दळवी यांच्याहस्ते करण्यात आले. अलिबाग येथील कै. सुमती कृष्णाजी नाईक या व्यासपीठावर या सामाजिक कादंबरीचे प्रकाशन समारंभात आप्पा ठाकूर यांचे गुंतलेले पाश हा गझल सादरीकरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. याप्रसंगी एका खूनखटल्यात निर्दोष सुटलेल्या काही व्यक्तीरेखांचा सत्कार करण्यात आला. हेमंत रणदिवे यांनी या कादंबरीतील एका प्रकरणाचे अभीवाचन केले. अमित नागावकर यांनी या कादंबरीचे समर्पक समिक्षण केले. मेघना म्हात्रे यांनी स्वागतगीत व पसायदान केले. पुणे येथील नंदिनी पब्लीकेशन हाऊसतर्फे संतोष तांबोळी, लेखक विलास नाईक, आमदार महेंद्र दळवी व गझलकार आप्पा ठाकूर यांनी मनोगत व्यक्त केले.

### सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

**कर्जत :** शिक्षिका, कवयित्री व समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त कर्जत नगरपरिषदेच्यावतीने अभिवादन करण्यात आले. सावित्रीबाई फुले यांची जयंती, महिला मुक्ती दिन म्हणून साजरा करण्यात येतो. कर्जत नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा सुवर्णा जोशी यांनी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी नगरसेविका प्राची डेरवणकर, संचिता पाटील, नगरसेवक राहुल डाळींबकर, सोमनाथ ठोंबरे, नगरपरिषद कर्मचारी सारिका कुंभार, रविंद्र लाड, बापू बेहराम, हृषिता शिंदे, सायली निंबरे, सामिया चौगुले आदी उपस्थित होते.



### सावित्रीबाई फुले जयंती साजरी

**माणगाव :** टिकमभाई मेथा कॉमर्स कॉलेजमध्ये क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला प्रभारी प्राचार्य हर्षल जोशी यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. प्रा. अशोक मोरे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची सविस्तर माहिती दिली.

# नव्या वर्षाची विजयी सुरुवात

## पहिल्या टी-२०मध्ये टीम इंडियाची श्रीलंकेवर मात

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाने नव्या वर्षाची सुरुवात विजयाने केली आहे. श्रीलंकेविरुद्धच्या मालिकेतील मंगळवारी (दि. ३) झालेला पहिला टी-२० सामना भारताने जिंकला. भारताने प्रथम फलंदाजी करताना ५ गड्यांच्या मोबदल्यात १६२ धावा केल्या होत्या. पाहुणा संघ सर्वबाद १६० धावांपर्यंतच मजल मारू शकला.

पटेलने टाकलेल्या शेवटच्या जादुई षटकाने भारताला दोन धावांनी विजय मिळवून दिला. त्याआधी शिवम मावीने धारदार गोलंदाजी करीत श्रीलंकेच्या फलंदाजांना पळताभुई थोडी केली. हार्दिक पांड्याने संघाच्या कर्णधाराची जबाबदारी उत्तम पार पाडली. हार्दिकच्या नेतृत्वातील युवा ब्रिगेडने मुंबईच्या वानखडे मैदानावर २००पेक्षा कमी धावसंख्येचा पहिल्यांदा बचाव करताना एक नवीन इतिहास रचला. मोक्याच्या वेळी



उपयुक्त खेळी करणाऱ्या दीपक हुड्डाला सामनावीराचा पुरस्कार देण्यात आला.

भारतीय संघ पहिल्या टी-२० सामन्यात नाणेफेक गमावत फलंदाजीला उतरला होता. भारतीय संघाच्या वरच्या फळीने झटपट विकेट्स गमावल्या होत्या. इशान किशन ३७ आणि हार्दिक पांड्या २९ धावा करून बाद झाले. स्टार फलंदाज सूर्यकुमार यादव, शुबमन गिल आणि संजू सॅमसन यांना दोन आकडी धावसंख्यादेखील गाठता आली नाही. भारताचा अर्धा संघ तंबूत गेला होता, परंतु तळातील फलंदाजांनी अशी काही खेळी केली की पाहुण्या संघाला सहावी विकेट मिळालीच नाही. यासह तळातील फलंदाजांच्या जोडीने शानदार भागीदारी रचत खास विक्रमाची नोंद केली. ती जोडी दीपक हुड्डा आणि अक्षर पटेल यांची आहे. भारतीय संघ एकेवेळी १४.१ षटकांत ५ विकेट्स गमावत ९४ धावांवर खेळत होता. त्या वेळी मैदानावर हुड्डा आणि पटेल खेळत होते. या दोघांनीही विकेट न गमावता श्रीलंकेच्या गोलंदाजांना चोप देण्यास सुरुवात केली. त्यांनी नाबाद ६८ धावांची भागीदारी रचली. या वेळी हुड्डाने २३ चेंडूंत १ चौकार व चार षटकारांसह ४१, तर पटेलने २० चेंडूंत ३ चौकार व १ षटकारासह ३१ धावांचे योगदान दिले. कासून रजिथा वगळता श्रीलंकेच्या सर्व गोलंदाजांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.

धावांचा पाठलाग करताना यजमानांची खराब सुरुवात झाली. कर्णधार दसून शनाकाने सर्वाधिक २७ चेंडूंत ४५ धावा केल्या. फलंदाज कुसल मेंडिस याने २८, तर वनिंदू हसरंगा याने २१ धावांचे योगदान दिले. याव्यतिरिक्त एकाही फलंदाजाला २० धावांचा आकडा पार करता आला नाही. भारताकडून शिवम मावी सर्वाधिक चार गडी बाद केले. उमरान मलिक आणि हर्षल पटेल यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

### ...म्हणून अक्षर पटेलला शेवटचे षटक दिले -पांड्या

श्रीलंकेविरुद्धच्या सामन्यात कठीण परिस्थितीमध्ये कर्णधार हार्दिक पांड्याने फिरकीपटू अक्षर पटेलला शेवटचे षटक देणे रणनीतीचा एक भाग होता. सामना संपल्यानंतर त्याने हा खुलासा केला. कर्णधार पांड्या म्हणाला, मला मुद्दाम या संघाला कठीण परिस्थितीत ठेवायचे आहे, कारण मोठे सामने आणि कठीण परिस्थितीत ते आम्हाला खूप मदत करेल. द्विपक्षीय मालिकेत आम्ही चांगले आहोत. भविष्यातही आम्ही अशाच आव्हानांचा सामना करणार आहोत.

## राष्ट्रीय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धा सिन्नरमध्ये

**मुंबई : प्रतिनिधी**

सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडिया आणि सायकलिंग असोशिएशन ऑफ महाराष्ट्र यांच्या वतीने २७व्या राष्ट्रीय रोड सायकलिंग अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन ५ ते ११ जानेवारीदरम्यान नाशिकमधील सिन्नर येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेत देशातील ३१ राज्ये आणि क्रीडा मंडळाचे संघ सहभागी होत असून स्पर्धेमधून राष्ट्रीय अकॅडमीसाठी खेळाडूंची निवड केली जाणार आहे, अशी माहिती सायकालिंग फेडरेशन ऑफ आशियाचे सेक्रेटरी जनरल ओंकार सिंग यांनी येथे पत्रकार परिषदेत दिली.



महाराष्ट्र सरकारतर्फे समृद्धी महामार्गामधील ५३४ ते ५६५ किमीचा भाग स्पर्धेसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे. त्यामुळे स्पर्धेचे आयोजन सोप झालेय, असे मत सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे सचिव प्रताप जाधव यांनी व्यक्त केले.

सहा दिवस चालणाऱ्या या स्पर्धेत५ आणि ६ जानेवारीला सहभागी संघ शिर्डी येथे दाखल होईल आणि ७ जानेवारीपासून स्पर्धेला आरंभ होईल. यात वेगवेगळ्या गटात शर्यती होतील.

## महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक स्पर्धेत तेजस्विनी, पुष्कराजचा 'सुवर्ण'वेध

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य ऑलिम्पिक स्पर्धेच्या नेमबाजी क्रीडा प्रकारात ५० मीटर रायफल प्रोन प्रकारात कोल्हापूरची ऑलिम्पिकपटू तेजस्विनी सावंत आणि रत्नागिरीच्या पुष्कराज इंगोले यांनी सुवर्णपदक मिळविले. माजी विश्वविजेत्या तेजस्विनीने महिलांच्या गटात ६१८ गुणांसह अग्रस्थान पटकावले. मुंबईच्या भक्ती खामकरचा तेजस्विनीने ४.५ गुणांच्या फरकाने पराभव केला. पुण्याची प्रणाली सूर्यवंशी (६११.७) कांस्यपदकाची मानकरी ठरली.

पुरुषांच्या गटात इंगोलेने एकूण ६२१.७ गुणांसह सुवर्णपदक जिंकले. कोल्हापूरच्या इंद्रजित मोहितने एकूण ६१८ गुणांसह रौप्यपदक, तर पुण्याच्या अभिजित सिंहने एकूण ६१२.९ गुणांसह कांस्यपदक पटकाविले आहे.


दरम्यान, मुंबई शहरने बलाढ्य ठाण्याला २-१ने पराभूत करून बडमिंटन महिला सांघिक स्पर्धेच्या अंतिम फेरीत प्रवेश केला. सुवर्णपदकाच्या लढतीत त्यांची गाठ दुसऱ्या मानांकित पुण्याशी पडेल. पुण्याने नागपूरचा २-१ अशाच फरकाने पराभव केला.

## मिनी ऑलिम्पिकसाठी रायगड जिल्हा सॉफ्ट टेनिस संघ जाहीर

### यश वारके, प्रतिक्षा शेरकरकडे धुरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्र राज्य मिनी ऑलिम्पिक स्पर्धेत ९ ते १२ जानेवारीदरम्यान पुणे बालेवाडी येथील शिवछत्रपती स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये होणाऱ्या सॉफ्ट टेनिस स्पर्धेत भाग घेणाऱ्या रायगड संघाची घोषणा जिल्हा असोसिएशनच्या अध्यक्ष सीताताई पाटील तसेच कार्याध्यक्ष पंकज भगत व सचिव स्वप्नील वारंगे यांनी नुकतीच जाहीर केली. २२ वर्षांनंतर होणाऱ्या महाराष्ट्र मिनी ऑलिम्पिक स्पर्धेत सॉफ्ट टेनिस या खेळाचा प्रथमच समावेश झाला आहे.





महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन व राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित पुणे येथील स्पर्धेत महाराष्ट्रातील पुरुष व महिलांचे प्रत्येकी आठ संघ स्पर्धेत सहभागी होणार असून रायगड जिल्ह्याला यात स्थान मिळाले आहे. पुरुष संघाच्या कर्णधारपदी राष्ट्रीय खेळाडू यश वारके याची, तर महिला संघाच्या कर्णधारपदी राष्ट्रीय खेळाडू प्रतिक्षा शेरकर यांची नियुक्ती जाहीर केली आहे. पुरुष व महिला संघांत फक्त राज्य स्पर्धेत प्राविण्य प्राप्त खेळाडूंना व जवळपास सात राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी खेळाडूंना रायगड जिल्हा संघात स्थान दिले असल्याची माहिती जिल्हहा असोसिएशनचे सचिव स्वप्नील वारंगे यांनी दिली. दोन्ही संघाचे प्रशिक्षण शिबिर ३ ते ७ जानेवारीदरम्यान किंग मार्शल आर्ट्स अ‍ॅकॅडमी अ‍ॅण्ड स्पोर्ट्स येथे आयोजित करण्यात आले आहे.

महाराष्ट्र राज्य मिनी ऑलिम्पिकमध्ये भाग घेणाऱ्या रायगड जिल्हा सॉफ्ट टेनिस संघातील खेळाडूंना जिल्हाधिकारी महेंद्र कल्याणकर, जिल्हा क्रीडा अधिकारी रवींद्र नाईक, क्रीडा अधिकारी सचिन निकम, जिल्हा क्रीडा मार्गदर्शक मनिषा मानकर, रायगड सॉफ्ट टेनिस असोसिएशनच्या अध्यक्ष व माजी उपमहापौर सीताताई पाटील, कार्याध्यक्ष मुख्याध्यापक पंकज भगत, उपाध्यक्ष सुजाता वारंगे, सचिव स्वप्नील वारंगे, क्रीडा मार्गदर्शक संजय गमरे, मंदार पनवेलकर, क्रीडा शिक्षक सचिन शिंदे, सुहास कांबळे, मंदार मुंबईकर, शशिकांत पाटील, राजेश मुंडे आदींनी शुभेच्छा दिल्या.

**पुरुष संघ** : यश वारके (कर्णधार), आदित्य मुंडे, श्रेयस गमरे, अश्विन प्रभू, आरुष नीटूरे. **महिला संघ** : प्रतिक्षा शेरकर (कर्णधार), काजल मंडल, श्रुती बोने, दिक्षा वलवे, समिक्षा शेरकर.

## शिवम मावीचे शानदार पदार्पण

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय संघाने नव्या वर्षातील पहिला सामना मंगळवारी मुंबईच्या वानखडे स्टेडियमवर श्रीलंकेविरुद्ध खेळला व या टी-२० लढतीत विजय साकारला. या सामन्यात शिवम मावीने शानदार पदार्पण करताना दोन विकेट्स घेतल्या.

१६३ धावांचा पाठलाग करण्यासाठी उतरलेल्या श्रीलंका संघाची सुरुवात अडखळत झाली. पदार्पण करणाऱ्या शिवम मावीने श्रीलंकेचा सलामीवीर पथुम निसांका बाद करून आपली पहिली विकेट मिळवली. मावीने आपल्या दुसऱ्या षटकाच्या धनंजय डी सिल्वाला बाद करून श्रीलंकेला दुसरा धक्का दिला.

## पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत महाराष्ट्राचे यश




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छत्तीसगडमधील भिलाई येथे राष्ट्रीय सिनियर पॉवरलिफ्टिंग स्पर्धा नुकतीच झाली. या स्पर्धेत सांघिक अजिंक्यपदात महाराष्ट्राने दुसरा, तर आंतरराज्य स्पर्धेत पुरुष व महिला यांनी पहिला क्रमांक पटकाविला.

स्पर्धेत महाराष्ट्राचे सरचिटणीस संजय सरदेसाई, शिवछत्रपती पुरस्कार विजेते व आंतरराष्ट्रीय पंच यांच्या मार्गदर्शनाखाली संघांनी चांगली कामगिरी केली. पुरुष व महिला संघाचे प्रशिक्षक म्हणून सूर्यकांत गद्रे, शिवछत्रपती पुरस्कारप्राप्त अनंत चाळके व विजय पाटील यांनी मार्गदर्शन केले. या दुहेरी यशाबाबत महाराष्ट्र पॉवरलिफ्टिंग असोसिएशनने आनंद व्यक्त केला आहे.

महाराष्ट्र संघातील पदकप्राप्त खेळाडूंना पुढील आंतरराष्ट्रीय स्पर्धांकरिता संघटनेचे अध्यक्ष अर्जुन पुरस्कार विजेते संजीव भास्करन व अन्य मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या आहेत.

## रणजी ट्रॉफी स्पर्धेत केदार जाधवचे दमदार शतक

**पुणे : प्रतिनिधी**

भारताच्या मधल्या फळीतील सक्षम पर्याय म्हणून केदार जाधवकडे एकेकाळी पाहिले जात होते, परंतु गेली तीनेक वर्षे तो क्रिकेटपासून दूरच आहे. रणजी करंडक स्पर्धेत त्याने आक्रमक फटकेबाजी केली. महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या केदारने आसामच्या गोलंदाजांना बदड बदड बदडले.



पुण्यातील डी. वाय. पाटील अकादमी येथे सुरू असलेल्या रणजी करंडक स्पर्धेतील सामन्यात आसामने पहिल्या डावात २७४ धावा केल्या. त्याला महाराष्ट्राकडून जोरदार प्रत्युत्तर मिळाले. सलामीवीर पी. शाह १८ धावांवर बाद झाला. त्यानंतर एस. वीर व एन. शेख यांनी महाराष्ट्राचा डाव सावरला. या दोघांची ७३ धावांची भागीदारी शेखच्या (४७) विकेटने संपुष्टात आली. त्यानंतर केदार मैदानावर आला आणि त्याने आक्रमक फटकेबाजी सुरू केली. केदारने १४६ चेंडूंत नाबाद १४२ धावा चोपल्या आहेत. त्याने १४ चौकार व सहा षटकार असे अवघ्या २० चेंडूंत ९२ धावा कुटल्या. महाराष्ट्राने दुसऱ्या दिवसअखेर २ बाद ३०७ धावा करताना ३३ धावांची आघाडी घेतली आहे.















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **—मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com